## कर्जतमधील शेकाप कार्यकर्त्यांचे सामूहिक राजीनामे

**कर्जत** : शेतकरी कामगार पक्षात पदाधिकाऱ्यांच्या नव्याने नियुक्त्या केल्या जात आहेत, मात्र या नियुक्त्या करताना विश्वासात घेतले जात नसल्याचा आरोप करीत कर्जत तालुक्यातील उमरोली जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनामे पक्षाचे जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील यांच्याकडे पाठवून दिले आहेत. त्यामुळे शेकापमधील गटबाजी व नाराजी उघड झाली आहे. नेरळ येथील विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत चर्चेअंती उमरोली गटातील शेकापच्या कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनामे देण्याचा निर्णय घेतला. **(पान २ वर..)**



शुक्रवार, १९ ऑगस्ट २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ३३

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

### अंतरंग

भाजपशी युती तोडली ती गद्दारी नव्हती का?/२

खोपोलीत आढळला डेंग्यूसदृश्य रुग्ण; आरोग्य यंत्रणा सतर्क/५

टीम इंडियाची झिम्बाब्वेविरुद्ध दणदणीत विजयी सलामी/८

# रायगडातील हरिहरेश्वरमध्ये संशयास्पद बोट

## एके ४७ रायफल्स, जिवंत काडतुसे आढळल्याने खळबळ



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर येथील समुद्रात गुरुवारी (दि. १८) संशयास्पद बोट आढळली. या बोटीमध्ये तीन एके ४७ रायफल आणि जिवंत काडतुसे असल्याने खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.



दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या हरिहरेश्वर तीर्थक्षेत्री मंदिराच्या जवळच समुद्रामध्ये गुरुवारी सकाळी एक बेवारस बोट स्थानिक नागरिकांना आढळून आली. या बोटीबाबत स्थानिकांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांचे पथक तातडीने त्या ठिकाणी रवाना झाले. या वेळी या बोटीची तपासणी केली असता त्यामध्ये तीन एके ४७ गन, जिवंत काडतुसे तसेच काही कागदपत्रे आढळून आली.

### हाय अलर्ट जारी

कोकणचा किनारा नेहमीच संवेदनशील राहिलेला आहे. मुंबईत १९९३मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटातील शस्त्रास्त्रे श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी बंदरात उतरविल्याचे नंतर उघड झाले होते. आता पुन्हा एकदा याच तालुक्यात गोपाळकाल्याच्या आदल्या दिवशी संशयास्पद बोट व हत्यारे आढळल्याने चर्चांना उधाण आले आहे. यानंतर हाय अलर्ट जारी करण्यात आला असून या घटनेबाबत रायगड पोलीस आणि दहशतवादविरोधी पथक सखोल तपास करीत आहेत.



### मुंबई, पुण्यातही नाकाबंदी

रायगड जिल्ह्यात संशयास्पद बोट आढळल्याने रायगडसह मुंबई आणि पुण्यातदेखील हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याचबरोबर नाकाबंदी करण्यात आली आहे. महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला असून वाहनांची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस आयुक्तांनी रायगडातील घटनेची दखल घेत तातडीची बैठक बोलावली आहे.

## ‘ती’ बोट ऑस्ट्रेलियन महिलेच्या मालकीची

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथे आढळलेल्या संशयास्पद बोटीसंदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत माहिती दिली. ही बोट एका ऑस्ट्रेलियन नागरिक महिलेची असून या बोटीचे इंजिन बिघडल्याने ती रायगडच्या समुद्रकिनाऱ्यावर तरंगत आली असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री फडणवीस म्हणाले की, आज हरिहरेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यावर एक १६ मीटर लांबीची बोट स्थानिकांना आढळून आली. त्यांनी ही माहिती स्थानिक पोलिसांनी दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत बोटीची पाहणी केली असता या बोटीत तीन एके-४७ रायफल, काडतुसे तसेच बोटीची कागदपत्रे आढळून आली. त्यानंतर तत्काळ हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. याची माहिती भारतीय कोस्टगार्ड आणि इतर यंत्रणांनाही देण्यात आली आहे.

पुढे ते म्हणाले, मिळालेल्या माहितीनुसार या बोटीचे नाव लेडीहान असून तिची मालकी ऑस्ट्रेलियन हाना लॉर्डर्सगन या महिलेची आहे. तिचे पती जेम्स हार्बट हे या बोटीचे कप्तान आहेत. ही बोट मस्कतहून युरोपकडे जाणार होती, मात्र बोटीचे इंजिन बिघडल्याने बोटीवरील सर्वांना रेस्क्यू करण्यात आले. समुद्र खवळला असल्याने बोटीच्या मालकाने ती टो केली नाही. त्यामुळे ती बोट वाहत श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर आली.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या संपूर्ण घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

# बियर शॉपीसमोर उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांना आवरा

## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

बियर शॉपीसमोरच बियरचे सेवन करणाऱ्या मद्यपींमुळे परिसर अस्वच्छ होत असून नागरिकांना नाहक त्रास होत असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला. याद्वारे त्यांनी नागरिकांच्या हिताकडे शासनाचे लक्ष वेधले.

पनवेल तालुक्यातील कळंबोली, कामोठे येथे परवानग्या देण्यात आलेल्या बियर शॉपसमोरच बियरचे सेवन करणाऱ्या मद्यपींमुळे परिसर अस्वच्छ होत असून नागरिकांना नाहक त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या बियर शॉपसमोर बियर सेवन करणारे मद्यपी बियरच्या बाटल्या त्याच ठिकाणी फेकत असल्याने बाटल्यांच्या काचांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असून महिलावर्गामध्ये या मद्यपींमुळे भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बियर शॉपीसमोर उघड्यावर बियर पिणाऱ्या मद्यपींवर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून उघड्यावर बियर पिण्यास परवानगी देणाऱ्या बियर शॉप मालकांवर तसेच दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता.



विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

राज्याचे उत्पादन शुल्कमंत्री शंभूराजे देसाई यांनी या प्रश्नावर लेखी स्वरूपात दिलेल्या उत्तरात सांगितले की, पनवेल तालुक्यातील कळंबोली, कामोठे बियर शॉपसमोरच बियरचे सेवन करणाऱ्या मद्यपींमुळे परिसर अस्वच्छ होत असून नागरिकांना नाहक त्रास होत असल्याचे निदर्शनास आल्याची बाब अंशतः खरी आहे. कळंबोली, कामोठे कार्यक्षेत्रातील एकूण ७ एफएल/बीआर-२ अनुज्ञप्तीच्या परिसरामध्ये ग्राहक मद्यसेवन करीत असल्याचे आढळून आले आहे. बियर शॉपीसमोर उघड्यावर बियर पिणारे मद्यपी आढळून आल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ नुसार कारवाई करण्याबाबत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड यांनी संबंधित कार्यक्षेत्रीय अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत. एप्रिल २०२२ ते जून २०२२ या कालवधीमध्ये पनवेल (जि. रायगड) तालुक्यातील कळंबोली, कामोठे कार्यक्षेत्रातील एकूण ७ एफएल/बीआर- २ अनुज्ञप्तीविरुद्ध विभागीय विसंगती गुन्हे नोंद करण्यात आले असून महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत तरतुदीनुसार त्यांच्यावर दंडात्मक कारवाई सुरू आहे.

### निवडक

#### ‘अल-कायदा’च्या दोन दहशतवाद्यांना अटक

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विशेष टास्क फोर्सने (एसटीएफ) उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील सासन येथील खरीबारी भागातून प्रतिबंधित दहशतवादी संघटना अल कायदाच्या दोन संशयित सदस्यांना बुधवारी रात्री अटक केली. अब्दुर रकीब सरकार आणि काझी अहसानुल्ला अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून दहशतवादी कारवायांसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

#### सात भारतीय, एका पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर सरकारची बंदी

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र संबंध आणि सार्वजनिक सुव्यवस्थेशी संबंधित प्रचार प्रसार करणारे आठ यूट्यूब चॅनेल ब्लॉक केले आहेत. या चॅनेलमध्ये सात भारतीय आणि एक पाकिस्तान आधारित यूट्यूब चॅनेलचा समावेश आहे. नियम २०२१ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.



**मुंबई : चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पेढा भरवून त्यांचे अभिनंदन केले. माजी प्रदेशाध्यक्ष व राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार किरीट सोमय्या व इतर मान्यवर उपस्थित होते.**

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम २०२३पर्यंत पूर्ण करणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम २०२३पर्यंत पूर्ण करणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी (दि. १८) विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात जाहीर केले. त्याचप्रमाणे २५ ऑगस्टपर्यंत या महामार्गावरील सर्व खड्डे बुजवण्यासंदर्भात आपण आधीच आदेश दिले आहेत, असे मंत्रीमहोदयांनी या वेळी सांगितले.



### मंत्री रवींद्र चव्हाण यांची माहिती


मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, मुंबई-गोवा महामार्गासंदर्भात संपूर्ण कोकणातील लोकप्रतिनिधी ज्या ज्या सूचना करतील त्या सर्व सूचनांचा आदर करून शक्य ते करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन. या महामार्गाचे काम २०२३पर्यंत पूर्ण करण्यात येईल तसेच २५ ऑगस्टपर्यंत सर्व खड्डे बुजवण्यासंदर्भात आपण आधीच आदेश दिले आहेत. २६ तारखेला तुमच्यापैकी कोणी आले तर आपण त्या मार्गाने एकत्र जाऊयात. सर्व समस्या सोडविण्यासंदर्भात योग्य तो निर्णय लवकरच घेतला जाईल.

## कर्जतमधील नवज्योत देशमुख ‘आयर्न मॅन’

**कर्जत : बातमीदार**

कझाकस्तानमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय ट्रायथलॉन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नवज्योत मारुती देशमुख या क्रीडापटूने आयर्न मॅन किताब प्राप्त केला आहे. नवज्योत हा रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पोटल पाली गावचा सुपुत्र आहे.

या स्पर्धेत सलग ३.८ किमी खुल्या जलप्रवाहात एकाच वेळी इतर स्पर्धकांसोबत पोहणे, त्यानंतर लगेच प्रचंड वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याविरुद्ध १८० किमी सायकलिंग करणे आणि लगोलग ४२.२ किमी धावणे ही आव्हाने पूर्ण करायची असतात. नवज्योतने सर्व आव्हाने १३ तास ३० मिनिटांत पूर्ण केली.




# आज दहीहंडीचा थरार!

## लाखोंच्या बक्षिसांचे लोणी चाखण्यासाठी गोविंदा पथके सज्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

लहान मुलांपासून सर्वांच्याच आवडीचा सण म्हणजे गोपाळकाला. हा सण शुक्रवारी (दि. १९) साजरा होत आहे. यानिमित्त उभारण्यात येणाऱ्या दहहंडीसाठी लाखो रुपयांच्या बक्षिसांची लयलूट होणार आहे. भाजपच्या वतीने उलवे नोडमध्ये एकूण तीन लाख ५५ हजार ५५५ रुपयांची पारितोषिके व आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे. या ठिकाणी महिलांची दहीहंडी विशेष आकर्षण असणार आहे, तर अलिबागमध्ये भाजपतर्फे एक लाख ५० हजार रुपयांची दहीहंडी उभारली जाणार आहे

कोरोनामुळे मागील दोन वर्षे दहीहंडीच्या उत्सवावर आणि उत्साहावर पाणी पडले होते. यंदा निर्बंध शिथिल झाल्याने गोविंदांमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे. रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात आठ हजार १६७ ठिकाणी दहीहंडी उभारण्यात येणार आहेत. त्यात एक हजार ९२८ सार्वजनिक, तर सहा हजार २३९ खासगी दहीहंड्यांचा समावेश आहे.

विविध ठिकाणी पारंपरिक पद्धतीने मिरवणुका काढल्या जाणार असून या दिवशी मनोरंजनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. दहीहंडी उत्सवाला अधिक रंगत आणण्यासाठी सिने कलाकार, गायकांनादेखील निमंत्रित करण्यात आले आहे.

दहीहंडी उत्सव साजरा करीत असताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलिसांकडून ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यामध्ये दंगल नियंत्रण पथक, राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, पोलीस मुख्यालयातील पोलीस कर्मचारी व होमगार्ड जवानांचा समावेश असणार आहे.



### दहीहंडीचा क्रीडा प्रकारात समावेश

**मुंबई** : महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आणि परंपरा असलेल्या दहीहंडीची प्रो गोविंदा स्पर्धा घेण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १८) विधानसभेत केली. स्पर्धेसाठी बक्षीसाची रक्कम शासनातर्फे देण्यात येईल. त्याचबरोबर खेळाडू संवर्गातून विजेत्यांना शासकीय नोकरी देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. विद्यमान सरकारने काही दिवसांपूर्वीच दहीहंडीच्या दिवशी सार्वजनिक सुटी जाहीर केली होती.

### दुर्घटनाग्रस्त गोविंदांना मिळणार मदत

**मुंबई** : दहीहंडी उत्सवात मानवी मनोरे तयार करताना दुर्घटना होऊन गोविंदांचा अपघाती मृत्यू होतो किंवा ते जखमी होतात. अशा गोविंदांना व त्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक सहाय्याची योजना आखण्यात आली आहे. यानुसार गोविंदा पथकातील खेळाडूचा दहीहंडीच्या थरावरून पडून मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसास १० लाख रुपयांचे सहाय्य, तर जखमी झाल्यासही आर्थिक मदत केली जाणार आहे.

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिवेशनात दाखल केला तारांकित प्रश्न

# राज्यातील मंजूर ट्रामा केअर सेंटरबाबत वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील मंजूर ट्रामा केअर सेंटरबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी लेखी उत्तरात दिली आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित करत याकडे लक्ष वेधले.

राज्यातील महामार्गावर होणारे अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता अपघातग्रस्तांसाठी तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध होण्यासाठी सन २०१३मध्ये १०८ ट्रामा केअर सेंटर उभारणीचा बृहत आराखडा शासनाने तयार केला आहे. सद्य:स्थितीत या १०८ ट्रामा केअर सेंटरपैकी केवळ ६३ सेंटर कार्यरत असून उर्वरीत ४५ सेंटरपैकी १५ सेंटरचे बांधकाम अपूर्ण तर ३० सेंटरचे आराखडेच तयार करण्यात आले नसल्याने हे ४५ सेंटर मागील नऊ वर्षापासून कार्यान्वित झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. यातील काही सेंटरसाठी जागा उपलब्ध नसून काही सेंटर बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे. तसेच, प्रत्येक ट्रामा केअर सेंटरमध्ये दोन अस्थव्यंगोपचार तज्ज्ञ, दोन बधिरीकरण तज्ज्ञ यासह ३३ पदांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचेदेखील निदर्शनास आले. त्या अनुषंगाने या प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी पावसाळी अधिवेशनात दाखल केला.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिलेल्या लेखी उत्तरात पुढे म्हटले की, सार्वजनिक आरोग्य विभागाने सन १९९७ ते आजपर्यंत १०८ ट्रामा केअर सेंटर मंजूर केले आहे. सन २०१३च्या बृहत आराखड्यानुसार ४२ नवीन ट्रामा केअर सेंटर्सना मंजुरी देण्यात आली आहे. यातील काही सेंटरसाठी जागा उपलब्ध नसून काही सेंटर बंद असल्याचेही निदर्शनास आल्याची बाब खरी आहे. तसेच प्रत्येक ट्रामा केअर सेंटरमध्ये दोन अस्थव्यंगोपचार तज्ज्ञ, दोन बधिरीकरण तज्ज्ञ यासह ३३ पदांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ट्रामा केअर सेंटरबाबत शासनास शिफारस करण्यासाठी गठीत तांत्रिक समितीचा अहवाल/शिफारशी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर २०२० स्विकारण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने ट्रामा केअर युनिटचे वर्गीकरण केले आहे. ट्रामा केअरची दर्जावाढ करण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने आयुक्तालयाने दि.२९ डिसेंबर २०११ रोजी ही शिफारशी विचारात घेऊन अस्तित्वात असलेल्या ट्रामा केअर युनिट संबंधित सुधारीत आकृतीबंध शासनास सादर केला आहे. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. परंतू या प्रस्तावात काही त्रुटी असल्याने त्याबाबत आयुक्तालयाकडून माहिती मागविण्यात आली असल्याचेही या वेळी सांगण्यात आले.




## मिशन वात्सल्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात मिशन वात्सल्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करीत शासनाचे लक्ष केंद्रित केले. याबाबत राज्याचे महिला व बालकल्याण मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले. तसेच या योजनेंतर्गत एकूण १,२०,६४० लाभार्थ्यांना शासन निर्णयामध्ये विविध २४ सेवांचे २५,९२४ एवढे लाभ देण्यात आले आहेत.

राज्यात कोरोना संसर्गाने मातृ-पितृछत्र हरपलेल्या अनाथ बालकांना तसेच कुटुंबातील कर्त्या पुरुषांचे कोरोनाने निधन होऊन एकल किंवा विधवा झालेल्या महिलांच्या उपजिविकेसाठी तसेच अर्थसहाय्य मिळवून देण्याचा प्रयत्न मिशन वात्सल्य या योजनेंतर्गत करण्यात यावा असे शासनाचे निर्देश आहेत तथापी, या योजनेच्या तालुका पातळीवर नियमित बैठका होत नसल्याचे एप्रिल २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. तालुक्याच्या तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली आठवड्याला एक याप्रमाणे महिन्याला चार बैठका घेणे अपेक्षित असतानाही मुंबई उपनगरातील अंधेरी, कुर्ला व बोरिवली या तीन तालुक्यात फक्त दोन बैठका आणि सहा महिन्यात पाच बैठकाही न झालेले अनेक तालुके असल्याचा आरोप एकल महिला पुनर्वसन समितीने केला असल्याचे निदर्शनास आले असून कोकण प्रदेशातील मुंबई, मुंबई उपनगर जिल्ह्यासह अन्य पाच जिल्ह्यातील १५० अनाथ बालकांची पी.एम.चाईल्ड केअर योजनेत नोंदणी झालेली असताना आतापर्यंत त्यापैकी केवळ ८३ बालकांच्याच खात्यात मुदत ठेव निधी जमा केला आहेत तर उर्वरित ठाणे (सर्वाधिक अनाथ बालके), व मुंबईसह ६७ लाभार्थी बालके या योजनेच्या मुदत ठेव निधीसह अन्य आर्थिक लाभांपासून वंचित राहिले असल्याचे एप्रिल २०२२ रोजी या त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, या योजनेच्या प्रत्येक तालुक्यात नियमित बैठका घेऊन तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा लाभ अनाथ बालकांना तसेच विधवा महिलांना देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, अशी विचारणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात करण्यात आली असून त्या अनुषंगाने योग्य कार्यवाहीची मागणी या प्रश्नातून अधोरेखित केली.

याबाबत राज्याचे महिला व बालकल्याण मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या संदर्भात दिलेल्या लेखी उत्तरात पुढे सांगितले की, एप्रिल २०२२ अखेर मिशन वात्सल्य अंतर्गत तालुका निहाय समित्यांच्या बैठका मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये अनुक्रमे अंधेरी-चार, कुर्ला-पाच बोरीवली-पाच अशा बैठका झाल्या आहेत. तर मुंबई शहर जिल्ह्यामध्ये सहा, रायगड जिल्ह्यामध्ये ४९ सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये २००, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ५५, ठाणे जिल्ह्यामध्ये ७ व पालघर जिल्ह्यामध्ये ३० इतक्या बैठका झाल्या आहेत. कोकण विभागातील सर्व पात्र लाभार्थ्यांना पीएम केअर फॉर चिल्ड्रेन योजनेचा लाभ देण्यात आला असून मिशन वात्सल्य योजनेंतर्गत १३ जुलै २०२२ अखेर एकूण १,२०,६४० लाभार्थ्यांना शासन निर्णयामध्ये नमूद २४ सेवांचे २५,९२४ एवढे लाभ देण्यात आले आहेत.

# भाजपशी युती तोडली ती गद्दारी नव्हती का?

### ■ उद्योगमंत्री उदय सामंत यांचा आदित्य ठाकरेंना सवाल



**मुंबइ : प्रतिनिधी**

शिवसेनेतून शिंदे गटात सामील झालेल्या आमदारांना गद्दार म्हणून सारखी टीका केली जात आहे. पण, भाजप आणि शिवसेनेची जेव्हा युती होती, त्यावेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत सरकार स्थापन केले, ती गद्दारी नव्हती का? असा परखड सवाल शिंदे गटाचे तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता केला.

पावसाळी अधिवेशनामध्ये शिंदे गटाच्या आमदारांविरोधात विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे शिंदे गटाचे आमदार कमालीचे अस्वस्थ झाले. मंत्री उदय सामंत यांनी याला जशास तसेच उत्तर दिले. 'गद्दार या शब्दाची व्याख्या मला कळत नाही. त्यामुळे गद्दार या शब्दाची व्याख्या स्पष्ट झाली पाहिजे महाराष्ट्रासमोर, त्यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सांगताहेत की, आमची नैसर्गिक आघाडी नव्हती. ही आघाडी कशी झाली, राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेस जर एकत्र लढली असती तर काही म्हणण्याचे कारण नव्हते. पण शिवसेना आणि भाजप एकत्र लढली मतदारांनी आम्हाला संधी दिली. त्यानंतर भाजपशी युती तोडून काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत जाणे ही गद्दारी होत नाही का? असा सवाल सामंत यांनी उपस्थित केला.

तपासाबाबत कुणालाही टार्गेट करण्याचा प्रश्न नाही. सर्व केंद्राच्या स्वतंत्र्य संस्था आहेत. त्यांना तपास करण्याचा पूर्ण अधिकारी आहे. तपास यंत्रणा या त्यांचे काम करत आहेत, अशी प्रतिक्रिया सामंत यांनी दिली.



**पनवेल : माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या पाठपुराव्यामुळे भिंगारी गावातील स्मशानभूमीत दोन दाहिनी बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. पालिकेच्या वार्षिक निधीमधून हे काम झाले आहे. दरम्यान, उर्वरित कामांची निविदाही लवकर काढण्यात येणार असल्याची माहिती अजय बहिरा यांनी दिली आहे. या कामांमध्ये रंगरंगोटी, गेट, फ्लोरिंग, स्टाईल, पेंटींग, कंपाउंड वॉल बसविणे, पत्रा टाकणे आदि कामांचा कामाचा पाठपुरावा अजय बहिरा यांच्या माध्यमातून महापालिकेकडे सुरू आहे.**

## सर्वसामान्यांना परवडणारी घरे देण्यासाठी कटिबद्ध

### मुख्यमंत्री शिंदे यांची ग्वाही; म्हाडा सोडतीचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**



सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बांधकामाच्या दरात म्हाडा घरे उपलब्ध करुन देत असून म्हाडा आणि सिडकोच्या माध्यमातून पोलीस निवासस्थाने तसेच सर्वसामान्यांना परवडणारी हक्काची घरे देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली.

पुणे मंडळ म्हाडाच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या पाच हजार २११ घरांच्या सोडतीचा आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे शुभारंभ करण्यात आला. या वेळी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, पुणे म्हाडा मंडळाच्या पाच हजार २११ सदनिकांसाठी सुमारे ९० हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी अर्ज केले आणि ७१ हजारांपेक्षा अधिक अर्जदारांनी अनामत रक्कम भरुन यात सहभाग नोंदविला हे शासन आणि म्हाडाची विश्वासार्हता वाढीला लागल्याचे उत्तम उदाहरण आहे. आज सोडत काढण्यात आलेल्या सदनिकांपैकी तीन हजार घरे ही तयार असून पुढील दीड महिन्यात त्यांचे वाटप केले जाईल तर उर्वरित सदनिकांचे काम एक-दीड वर्षात पूर्ण करुन त्यांचे वाटप करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. स्वतःचे घर हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न आहे, हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी परवडणाऱ्या किंमतीत घरांची संकल्पना मांडली आणि प्रधानमंत्री आवास योजनांसारख्या विविध योजनांमधून हक्काची घरे उपलब्ध करुन दिली जात आहेत असे सांगून हे सर्वसामान्यांचे सरकार असून प्रत्येकाच्या मनात सरकारबद्दल असणारा विश्वास अधिक वृद्धिंगत करण्यासाठी यंत्रणांनी जोमाने काम करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घरे' संकल्पनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात म्हाडाचा मोठा सहभाग आहे, राज्यात विविध गृह प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.

## महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेचा कार्यक्रम जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दि. १५ नोव्हेंबर, २०२२ पासून सुरु होणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धांसाठी हौशी नाटय संस्थांकडून दिनांक १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर, २०२२ पर्यंत प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

६१ व्या हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक १५ नोव्हेंबर २०२२पासून महाराष्ट्र राज्यातील विविध स्पर्धा केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ६१व्या महाराष्ट्र राज्य हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धांची अंतिम फेरी एक जानेवारी २०२३पासून प्रत्येकी एका केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच १९व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची स्पर्धेची प्राथमिक फेरी १ जानेवारी २०२३पासून १० केंद्रांवर आयोजित करण्यात येणार असून दिव्यांग बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी फेब्रुवारी २०२३मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. नाट्य स्पर्धेकरीता रु.३,००० इतक्या अनामत रकमेचा धनाकर्ष तर बालनाट्य स्पर्धेकरीता रु.१,००० इतक्या रकमेचा धनाकर्ष स्पर्धक संस्थेने संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे पाठवावयाचा आहे.

प्रयोग सादर केल्यानंतर त्याच रकमेचा धनाकर्ष (डीडी) संस्थांना परत करण्यात येईल. नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या www.mahasanskruti.org या वेबसाईटवर नवीन संदेश या मथळ्याखाली उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका १५ सप्टेंबर, २०२२ पर्यंत खालील पत्त्यावर सादर कराव्यात. मुंबई, कोकण व नाशिक विभागातील संस्थांनी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ३२ या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

पुणे महसूल विभागातील संस्थांनी, सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, बंगला क्रमांक-४, विमानतळ रोड, पुणे या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात. औरंगाबाद महसूल विभागातील संस्थांनी सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, रुम नंबर-०२, एमटीडीसी बिल्डिंग, गोल्डी टॉकीजच्या समोर, स्टेशन रोड, औरंगाबाद या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात. नागपूर व अमरावती महसूल विभागातील संस्थांनी सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, द्वारा अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय, अस्थायी प्रदर्शन हॉल, तळमजला, नागपूर या पत्त्यावर प्रवेशिका पाठवाव्यात.

## दुखवटा

### अण्णा वाडकर

**मुरुड :** सर एस. ए. हायस्कूलचे वरिष्ठ लिपिक अण्णा बाबू वाडकर यांचे नुकतेच निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय ५६ होते. त्यांचा मनमिळावू स्वभाव व सर्वांना मदत करण्याची वृत्ती यामुळे अण्णा हे सर्वांना सुपरिचित होते. त्यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी हा पुरस्कारसुद्धा मिळाला होता. दरम्यान, त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी व पत्नी असा परिवार आहे.



### कल्पना सोनटक्के



**पनवेल :** तालुक्यातील पोयंजे येथील नागरिक ह. भ. प. कमळाकर सोनटक्के यांच्या पत्नी कल्पना सोनटक्के यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### सुशीला भोईर

**पनवेल :** पनवेल येथील सुशीला बाळाराम भोईर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि. २४) नाशिक येथे होणार आहे. तसेच तेरावे गुरुवार (दि. २५) त्यांच्या घरी नांदगाव येथील घरी होणार आहे. सुशीला भोईर या पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या सासू होत.



पान १ वरून

### कर्जतमधील शेकाप कार्यकर्त्यांचे राजीनामे

राजीनामे देणाऱ्यांमध्ये नेरळ विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन राजेंद्र विरले, तालुका उपचिटणीस मारुती विरले, पुरोगामी युवक संघटनेचे मावळते अध्यक्ष वैभव भगत तसेच जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य विष्णू कालेकर, रामदास शेलार, दशरथ शेंडे, सुहास भगत, विद्यार्थी संघटनेचे सुशील कालेकर, परेश कोळंबे, माजी उपसरपंच रामदास हजारे, उपसरपंच सदानंद थोरवे तसेच नितेश भगत, राजेश नाईक, सुरज भगत, निलेश ठोंबरे यांचा समावेश आहे. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे पक्षाचे जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील यांच्याकडे पाठवून दिले आहेत तसेच राजीनामापत्राच्या प्रती पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्यासह आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, पंडित पाटील यांना पाठविल्या आहेत. त्यामुळे पक्षात खळबळ माजली आहे.

## आचार्य अत्रे पुरस्काराने प्रकाश कुलकर्णींचा सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**




मुंबई मराठी पत्रकार संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वि. वाबळे हे अध्यक्षस्थानी होते. या वेळी प्रमुख पाहूणे म्हणून खासदार सुनील तटकरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे, विश्वस्त देवदास मटाले, वैजयंती आपटे-कुलकर्णी, राही भिडे, कार्यवाह संदिप चव्हाण उपस्थित होते.

या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी आचार्य अत्रे यांच्या निर्भीड, परखड आणि लोकाभिमुख पत्रकारितेचा मुक्तकंठाने गौरव केला. पत्रकार सदस्यांच्या गुणवंत पाल्यांचा तसेच पत्रकार संघाच्या पत्रकारिता प्रशिक्षणार्थींचा भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक कार्यवाह संदीप चव्हाण यांनी केले तर संयुक्त कार्यवाह विष्णू सोनवणे यांनी आभार मानले. सुत्रसंचालन शैलेंद्र शिर्के यांनी केले. कार्यक्रमाला मान्यवर होते.

### स्व. विनायक मेटे यांची रविवारी शोकसभा



**खालापूर :** मराठा समाजाचे दिवंगत नेते माजी आमदार विनायक मेटे यांना सकल मराठा समाज रायगड जिल्ह्याच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही शोकसभा रविवारी (दि. २१) संध्याकाळी ५ वाजता खालापूर तालुक्यातील साजगाव ताकई येथील विठ्ठल मंदिर (धाकटी पंढरी) या ठिकाणी होईल. या वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन केले गेले आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-34/22-23 7000024158 1st extn. | Work of replacement of tower for location No. 25, 26 HZ6, 30 of 100kV Padghe - Mohone line & 100kV Padghe - Ambernath under EHV Line maint. S/Dn. Padgha under EHV (O&M) Division Dombivali under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 5000/- + GST** | **Rs. 133.72 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 18.08.2022 to 25.08.2022 up to 23:59 hrs., Opening date:- 26.08.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558
E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# शाळांमध्ये बाळगोपाळांची दहीहंडी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व कॉलेजमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त गोविंदाच्या गजरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले. जन्माष्टमी व दहीहंडी म्हणजे महाराष्ट्राचे लाडके उत्सव, त्या उत्सवांचे महत्त्व व परंपरा यांच्या बरोबरीने मनोरंजनही असा दुहेरी हेतू साध्य झालेला पाहायला मिळाला.

लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या प्रांगणात इन्स्पेक्टर रयत शिक्षण संस्था (रायगड विभाग) रोहिदास ठाकूर व मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती दाखवणारे बाल्या नृत्य सादर केले. तसेच विद्यार्थ्यांना या सणामागचा मुख्य हेतू व कारणे समजावित यासाठी शिक्षकांनी पथनाट्य सादर केले.

विद्यार्थ्यांना केवळ सण, समारंभ यांची कल्पना असावी असे नाही तर त्यामागची कारणे व परंपरा या देखील माहीत होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन स्वप्नाली म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमास शाळेच्या पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर, कुसुम प्रजापती व नेहा खन्ना व तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांचा आनंद घेतला.






रामशेठ ठाकूर विद्यालय, कामोठे



सीकेटी विद्यालय, नवीन पनवेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यमात गुरुवारी (दि. १८) दहीहंडी मोठ्या उत्साहात साजरी झाली. पर्यवेक्षिका संध्या अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असून, छोट्या बाळगोपाळांनी नाचत गात मोठ्या उत्साहात कार्यक्रम साजरा केला.



या दहीहंडी कार्यक्रमासाठी इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका इंग्रजी माध्यमिक विभागाच्या अदुरी नीरजा, इंग्रजी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी पूर्वप्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका संध्या अय्यर, नंदकुमार देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दहीहंडीच्या पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली तसेच छोट्या कृष्णाच्या हाताने दहीहंडी फोडण्यात आली. सर्व मुले कार्यक्रमासाठी राधाकृष्णाच्या वेषभूषेत आली असून, छोट्या बाळगोपाळांनी नाचत गात मोठ्या उत्साहात दहीहंडी कार्यक्रम साजरा केला.



**कामोठे : येथील सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुवारी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून नृत्य, गाणी सादर करीत दहीहंडी फोडली.**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये दहीहंडी उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या समारंभात दहीहंडीचे पूजन गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत व स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख आणि रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, जुनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



गव्हाण विद्यालय

उपसरपंच विजय घरत यांनी एक हजार एक रुपयाचे दहीहंडीसाठी पारितोषिक दिले, तर अनंताशेठ ठाकूर यांनी पाचशे रुपये, लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी २०० रुपयाचे पारितोषिक दहीहंडीसाठी दिले. तसेच गव्हाण ग्रामपंचायत उपसरपंच विजय घरत यांनी पुढील वर्षापासून विद्यालयाच्या दहीहंडीसाठी रुपये ५५०१ रकमेचे पारितोषिक जाहीर केले.

या वेळी डोळ्यावर पट्टी बांधून दहीहंडी फोडण्याचा मान विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे यांनी पटकाविला. तसेच विद्यालयाच्या वर्गनिहाय गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडली.

या उत्सवात सर्व विद्यार्थी, अध्यापक व सर्व सेवक उत्साहाने सहभागी झाले. विद्यार्थी व शिक्षक-शिक्षिकांनीही संगीताच्या तालावर ठेका धरून आनंदोत्सव साजरा केला. सोहळ्याचे प्रास्ताविक ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले तर सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले. देवेंद्र म्हात्रे यांनी आभार मानले.

## भाजपतर्फे खांदा कॉलनीत भव्य दहीहंडी उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी व माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक संजय भोपी आणि दत्तात्रय स्पोर्ट्स क्लब, खांदा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी शुक्रवारी (दि. १९) खांदा कॉलनी सेक्टर ६ येथील श्री कृपा हॉल समोरील मैदान येथे भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सवात प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापालिका माजी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहराध्यक्ष वर्षा नाईक, खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे, प्रभाग १५ अध्यक्ष शांताराम महाडिक यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोर्चा व युवा मोर्चाचे पदाधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे.

खांदा कॉलनी व आसपासच्या परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गोविंदा पथकांना प्रोत्साहन देत कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक संजय भोपी यांनी केले आहे.

## उलवे नोडमध्ये भाजपची दहीहंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप उलवे नोड २च्या वतीने भव्य दहीहंडी उत्सव २०२२चे आयोजन करण्यात आले आहे.

उलवे नोड सेक्टर ८ खारकोपर येथील जय हनुमान मैदान होणारा हा उत्सव शुक्रवारी (दि. १९) दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत होईल. तीन लाख ५५ हजार ५५५ रोख रुपये व आकर्षक ट्रॉफी असे दहीहंडी उत्सवाच्या पारितोषिकाचे स्वरूप आहे.

दरम्यान, पंचम निर्मित गंध सुरांचा हा हिंदी व मराठी लोकगीत, कोळीगीत तसेच लावणी गीतांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. यामध्ये प्रसिद्ध गायक जगदीश पाटील, सुर नवा ध्यास नवा फेम शिवाजीनगर येथील श्वेता सुरेश ठाकूर व मिस समर तुलीप इंडिया दिपिका पाटील यांची विषेश उपस्थिती लाभणार आहे. तसेच विशेष आकर्षण म्हणून महिलांची दहीहंडी होणार आहे. या सर्व कार्यक्रमांसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन, भाजप उलवे नोड २च्या वतीने करण्यात आले आहे.



## उरण येथे महेश बालदी मित्र मंडळातर्फे दहीहंडी

**उरण : वार्ताहर**

गोपाळकाला शुक्रवारी (दि. १९) असल्याने महेश बालदी मित्र मंडळ वतीने उरण नगर परिषदेचे तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्राथमिक शाळा पेन्शनर्स पार्क येथे दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. दहीहंडी कार्यक्रम सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत असेल असे आयोजकांनी सांगितले. सलामी देणाऱ्या गोविंदा पथकास अकरा हजार रुपये देण्यात येतील.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह व महेश बालदी मित्र मंडळ सदस्य आदींचे सहकार्य मिळणार आहे.

## भाजप पुरस्कृत 'ओंकारेश्वर'ची दहीहंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पुरस्कृत श्री ओंकारेश्वर सामाजिक व संस्कृत मंडळाच्या वतीने दहीहंडी २०२२ उत्सवाचे आयोजन सेक्टर १३ खांदा कॉलनी येथे करण्यात आले आहे. परिसरातील सर्व दहीहंडी पथकांनी व रहिवाशांनी नागरिकांनी दहीहंडी करता उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष भिमराव पोवार यांनी केले आहे.

या मंडळाद्वारे दरवर्षी रामनवमीनिमित्त साई भंडारा गणेशोत्सव, नवरात्रोत्सव त्याचप्रमाणे मंडळाच्या वतीने सध्या झालेल्या घर घर तिरंगा या उपक्रमाद्वारे मोफत तिरंग्याचे वाटप तसेच पावसाळ्यामध्ये सिडकोच्या सफाई कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना मोफत छत्र्यांचे वाटप असे विविध उपक्रम करण्यात आले. यासोबतच कोविडमध्ये व्हॅक्सिनेशनचेसुद्धा आयोजन केले गेले. निरनिराळे कार्यक्रम या मंडळाद्वारे भाजप पुरस्कृत आयोजित केले जातात.

## खारघर-तळोजातील रस्ते दुरुस्ती कामांचा वेग वाढवण्याची मागणी



भाजपचे सिडकोला निवेदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर तळोजातील रस्ते दुरुस्तीच्या कामांचा वेग वाढवण्यात यावा, अशी मागणी भाजप खारघरच्या वतीने सिडकोकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात निवेदनही देण्यात आले आहे.

सन २०१९ मध्ये खारघरमध्ये आणि तळोजा शहरामध्ये सिडकोमार्फत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले होते. या दोन शहरांतील बहुतांश रस्त्यांची चाळण झाली आहे. गेल्या वर्षीच्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या सततच्या मागणी आणि पाठपुराव्यामुळे यावर्षी रस्त्यांच्या डागडुजीसाठी वार्षिक करार झाला आहे. तरी कामाचा आढावा घेता डागडुजीसाठी वेळ लागत आहे. भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात रहिवासी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तक्रारी करीत आहेत.

रस्ता दुरुस्तीच्या कामांना वेग यावा यासाठी भारतीय जनता पक्ष खारघर तलोजा शहर मंडलातर्फे याबाबत कार्यकारी अभियंता खारघर, मुख्य अभियंता सिडको, सिडकोचे व्यवस्थापकिय संचालक यांना निवेदने देण्यात आली. तसेच कोकण भवन येथील मुख्यमंत्री कोकण विभागिय कार्यालयात ही याबाबत निवेदन दिले आहे.

या वेळी खारघर तळोजा मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष दीलीप जाधव व ज्येष्ठ कार्यकर्ता गिरिश गुप्ता उपस्थित होते.

पावसामुळे रस्ते दुरुस्तीत अडथळे येत आहेत. पावसाची उघडीप आल्यावर कामांना वेग येईल. रात्रभर कामे चालू असून लवकरच सर्व रस्त्यांची डागडुजी करण्यात येईल, असे खारघरचे कार्यकारी अभियंता गिरिश रघुवंशी यांनी सांगितले.

## ट्रेलरवर धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

गव्हाण फाटा येथे रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रेलरवर पाठीमागून एक मोटरसायकल धडकली. अपघातात मोटरसायकल चालकाचा मृत्यू झाला आहे. अपघाताला कारणीभूत ठरलेल्या ट्रेलरचालकाने ट्रेलर धोकादायक स्थितीत रस्त्यावर उभा केल्यामुळे हा अपघात झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे शहर पोलिसांनी ट्रेलरचालक ब्रिजेश लालपती पाल (वय २६) याला अटक केली आहे.

या अपघातात मृत झालेल्या मोटरसायकल चालकाचे नाव यज्ञेश विजय कोळी (वय ३५) असे असून तो उरणच्या करंजा नवापाडा भागात राहत होता. यज्ञेश हा करंजा नवापाडा येथून दुचाकीवरून पनवेल येथे कामानिमित्त जात होता. या वेळी गव्हाणफाटा ते पनवेल मार्गावरील साई ढाब्यासमोरील रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रेलरवर यज्ञेश मोटरसायकलसह जोरात धडकल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.



## संपादकीय

# धोक्याचा इशारा

हरिहरेश्वरच्या किनाऱ्यावर सापडलेल्या संशयास्पद बोटीबद्दल गुरूवारी उलटसुलट अफवा पसरल्या. मुंबई-पुण्यासारख्या नजीकच्या शहरांमध्ये पोलिसांनी ताबडतोब नाकाबंदी सुरू केली. येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी होऊ लागली. अखेरीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात विधिमंडळाच्या सभागृहात निवेदन केले. या घटनेमागे अतिरेक्यांचा सहभाग असल्याचे प्रथमदर्शनी तरी दिसत नसल्याचे गृहखाते देखील सांभाळणाऱ्या फडणवीस यांनी सांगितले. अर्थात तसे असले तरीही सणासुदीच्या दिवसांत बेसावध राहून चालणार नाहीच.

**महाराष्ट्राला सुमारे ७२० किमी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. उत्तरेमध्ये दमण गंगेपासून दक्षिणेत तेरेखोलच्या खाडीपर्यंत पसरलेली कोकण किनारपट्टी हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अवघ्या देशाचे भूषण समजले जाते. एवढ्या महाप्रचंड किनारपट्टीची देखरेख करणे हे काही सोपे काम नाही. समोर अफाट पसरलेल्या अरबी समुद्रातून अनेक लहानमोठी जहाजे जात-येत असतात. त्यामध्ये मच्छिमार बोटींपासून प्रचंड मोठ्या मालवाहू नौकांपर्यंत अनेक जहाजांचा समावेश असतो. या बोटींमधील बेकायदेशीर बोट कुठली हे ओळखणे म्हणजे गवताच्या गंजीमधून सुई शोधण्यासारखेच आहे. तरीही भारतीय तटरक्षक दलाच्या सहाय्याने महाराष्ट्राचे पोलीस एवढ्या मोठ्या किनारपट्टीवर नियमित गस्त घालत असतात. एवढा प्रयास केल्यानंतर देखील २००८ साली भीषण अतिरेकी हल्ल्याने मुंबई महानगरी हादरली होती. पाकिस्तानी अतिरेक्यांचे हे टोळके समुद्रमार्गेच मुंबईच्या किनाऱ्यावर उतरले होते. त्याच सुमाराला समुद्राची बाजू किती उघड्यावर पडलेली आहे किंवा तेथील सुरक्षा व्यवस्था किती अपुरी आहे याची चर्चादेखील झाली होती. गुरूवारी सकाळी हरिहरेश्वरच्या किनाऱ्यावर एक अज्ञात गलबत भारतीय तटरक्षक दलाच्या पथकाच्या नजरेस पडले. ही मध्यम आकाराची नौका बेवारस अवस्थेत भरकटून किनाऱ्याला लागली होती असे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले. परंतु या घटनेने महाराष्ट्रात काही काळ थोडीशी घबराट उडाली. त्याचे कारणही स्वाभाविक होते. या बोटीवर तीन एके-४७ रायफली आणि शेकडो बंदुकीच्या गोळ्या १२ खोक्यांमधून आढळल्या. सदर बोट एका ऑस्ट्रेलियन महिलेच्या मालकीची असून गेल्या २६ जून रोजी मस्कत जवळील समुद्रात ती बोट बुडाल्याचे कळले होते. या बोटीवर संबंधित मालकीणीचा पती कॅप्टन म्हणून नियुक्त होता. खवळलेल्या समुद्रात इंजिन निकामी झाल्यानंतर एका कोरिअन जहाजाने त्यांना वाचवले. समुद्राला उधाण असल्याकारणाने बोट टोइंग करून नेता न आल्याने ती भरकटली असे एकंदरीत दिसते. तथापि या छोट्याशा बोटीवर एके-४७ सारख्या स्वयंचलित बंदुका असण्याचे कारण काय हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. दुर्घटनाग्रस्त बोट जून महिन्यामध्ये मस्कतहून युरोपकडे निघाली होती असे तटरक्षक दलाच्या पत्रकात म्हटले आहे. जून महिन्यामध्ये समुद्र खवळलेलाच असतो. अशा उधाणलेल्या अवस्थेत ही छोटीशी बोट युरोपपर्यंत पल्ला कशी मारणार होती असाही प्रश्न पडतो. अतिरेकी हल्ल्याची शक्यता तूर्त जरी वाटत नसली तरी या संपूर्ण प्रकरणाची कसून चौकशी होण्याची गरज आहे. समुद्रमार्गे दहशतवादी टोळ्या महाराष्ट्रात शिरकाव करू शकतात याचा अनुभव आपल्या गाठीला आहेच. रस्त्यांवर नाकेबंदी करून फारसे काही हाती लागणार नाही याची जाणीव संरक्षण यंत्रणांना असतेच. समुद्र किनाऱ्यांवर गस्त घालण्याची जबाबदारी फक्त तटरक्षक दलाची नसून किनाऱ्यावरील नागरिक आणि स्थानिक मच्छिमारांनी देखील आगामी काळात डोळ्यांत तेल घालून दक्ष राहण्याची गरज आहे. कारण गणेशोत्सवासारखे सणासुदीचे दिवस तोंडावर आले आहेत.**


# वर्षासहलीसाठी अलिबाग खुणावतेय!

फेसाळलेल्या समद्राच्या लाटा आणि धो-धो कोसळणारा पाऊस, पायापर्यंत येणारी एखादी अवखळ लाट, पश्चिमेककडून येणारा भन्नाट वारा अंगावर घेत पावसाळ्यात किनाऱ्यावर घेतलेला वॉक म्हणजे सुखद अनुभव असतो. या वातावरणात समुद्रकिनाऱ्यांची सफर करण्याची मौज काही वेगळीच आहे. अलिबाग तालुक्यात केवळ समुद्रकिनारेच आहेत असे नाही तर या तालुक्यात वर्षासहलीचा आनंद लुटण्यासारखे बरेच काही आहे. ऐतिहासिक स्थळे, किल्ले, देवस्थाने, तलाव, धबधबे आदि आहेत.

मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण या शहारांपासून कही तासांच्या अंतरावर असलेले अलिबाग पर्यटकांचे पसंतीचे ठिकाण बनले आहे. एका दिवसाच्या सुट्टीत सकाळी अलिबागला येऊन सायंकाळी पुन्हा आपल्या घरी जाता येते. त्यामुळे अलिबागला येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सुंदर समुद्र किनारे, नारळ-फोफळीच्या बागा. अलिबागमधील हे सर्व सौंदर्य पर्यटकांना भूरळ घालते. अलिबाग आता मीनी गोवा म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. पूर्वी फक्त उन्हाळ्यात पर्यटक अलिबागला येत असत आता वर्षा सहलीसाठी देखील अलिबाग फेवरेट बनले आहे. अलिबागला आल्यावर केवळ अलिबागचाच समुद्रकिनारा पाहता येतो असे नाही तर आसपासचे किनारे देखील एका दिवसात पाहता येतात.

आलिबाग तालुक्यात अलिबाग, वरसोली, किहीम, आवास, आक्षी, नागावा, रेवदंडा हे स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारे आहेत. येथील किनाऱ्यालगत असलेल्या कॉटेजेसमध्ये वास्तव्य करून पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटता येतो. टूमदार घरे, कॉटेजेस, रिसॉर्ट, नारळ-सुपारीच्या बागा, समुद्रकिनाऱ्याच्या आजुबाजूला असलेली सुरूची झाडे आणि सगळीकडे निसर्गाची मुक्त उधळण या भागामध्ये पाहायला मिळते.





### कमी खर्चात व वेळेत उत्तम पर्याय

***अलिबाग तालुक्यात केवळ समुद्रकिनारेच आहेत असे नाही तर या तालुक्यात पावसाळ्यात पर्यटनाचा आनंद लुटण्यासारखे बरेच काही आहे. कनकेश्वर, सिध्देश्वर, चौलचे दत्त मंदिर ही डोंगरावर असलेली देवस्थाने आहेत. कणकेश्वर व सिध्देश्वर या दोन ठिकाणी श्रावणी सोमवारच्या दिवशी भाविकांची गर्दी असते. सिध्देश्वरजवळच सागरगड आहे. सिध्देश्वरच्या पायथ्याशी धबधबा आहे. तीनविरा धरण, सिद्धेश्वर, कुर्डूसचा धबधबा या ठिकाणी वर्षासहलीचा चांगला आनंद घेता येतो. वर्षासहलीचा आनंद घेण्यासाठी कमी खर्चात आणि कमी वेळेत पोहचता येईल असे अलिबागसारखे दुसरे ठिकाण नाही. वर्षासहलीचा आनंद घेण्यासाठी अलिबागला एकदा तरी सर्वांनी यायलाच हवे.***

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**


अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावर पावसाळ्यात वर्षा सहलीचा आनंद घेता येतो. समुद्रकिनाऱ्यावर फिरताना कुलाबा किल्ल्यातदेखील जाता येते. भरती मोठी असल्यास किल्ल्यात जाण्याचे टाळावे. कारण पावसाळ्यात पूर्ण ओहोटी होत नाही. त्यामुळे स्थानिक व्यक्तीला सोबत घेऊन ओहटीच्या वेळीच किल्ल्यात जावे. अन्यथा पावसळ्यात किल्ल्यात जाण्याचे टाळावे. अलिबाग शहरात सरखेल कान्हाजी आंग्रे यांची समाधी, भूचुंबकीय वेधशाळा, काळंगादेवी मंदिर, हिराकोट तलाव या स्थळांनादेखील भेट देता येईल. जिल्हाधिकारी निवासस्थानाच्या शेजारी असलेली वन विभागाचे गार्डनदेखील छान आहे. अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर लावण्यात आलेल्या तोफेमुळे या किनाऱ्याच्याय सौंदर्यात भर पडली आहे. अलिबाग किनाऱ्यावरील सेल्फीपॉइंट पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. अलिबाग समुद्रकिनाऱ्याच्या बंधाऱ्यावरून फिरण्याची मजा काही औरच आहे. अलिबागच्या वेशीवर असलेला वरसोली हा स्वच्छ समुद्रकिनारा आहे. किनाऱ्यावर असलेले सुरूचे बन हे या किनाऱ्याचे वैशिष्ट्य आहे. येथे कॉटेज व रिसॉर्ट आहेत. त्यामुळे निवासाची गैरसोय होत नाही. वरसोलीत आल्यानंतर तेथील विठ्ठल मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेऊन पुढे जाता येते. वरसोलीहून १० कि.मी. अंतर किहिम समुद्रकिनारा आहे. किहिमच्या समुद्रकिनाऱ्यावर गेल्यानंतर कुठेतरी हा समुद्र किनारा पाहिल्याचे आपल्याला भासते. बऱ्याच हिंदी चित्रपटांमध्ये या किनाऱ्याचे आपल्याला दर्शन झाले आहे. किहीमला समुद्रकिनाऱ्याला लागूनच निवासासाठी बंगले, खोल्या, वाडी, कॉटेजेस यांची व्यवस्था आहे.

किहिमपासून काही अंतरावर गेल्यास आवास, सासवणे हे समुद्रकिनारे आहेत. देवांचा वास असलेले गाव ते आवास. या गावातील नागेश्वर हे देवस्थान प्रसिध्द आहे. आवासचा समुद्रकिनारा नितांत सुंदर आहे. आवासवरून सासवण्याला जाता येते. सासवण्याला जाताना करमरकरांचे शिल्पालय आहे. ते पाहून पुढे सासवण्याला गेल्यावर तेथे समुद्रकिनाऱ्यावर खडाकांवर आपटणाऱ्या लाटा, लाटांमधून अंगावर उडणारे तुषार याचा आनंदच काही वेगळा आहे. अलिबागकडून मुरूडला जाताना आक्षी व नागाव ही दोन गावे लागतात. या गावांनादेखील सुंदर समुद्रकिनारे लाभले आहेत. आक्षी-नागाव येथील समुद्र किनारे विस्तीर्ण आणि सुरक्षित आहेत. निसर्गाचे मुक्त सौंदर्य, एकांतवास यामुळे हे किनारे पर्यटनासाठी उत्तम ठिकाण आहेत. येथे निवासाची व भोजनाची चांगली सोय आहे. रेवदंडा अलिबागपासून १७ कि.मी. अंतरावर आहे. रेवदंडा हे अलिबाग तालुक्यातील शेवटचे गाव आहे. पुढे कुडलिका नदीवरील पूल ओलांडून गेल्यानंतर मुरूड तालुका सुरू होतो. रेवदंडा किल्ल्यात वसलेले गाव आहे. या किल्ल्याप्रमाणे तेथील समुद्रकिनारादेखील आनंद देतो. कोकणातील खरे सौंदर्य येथेच आहे.





## बदलते तंत्रज्ञान



### तुमच्या नावावर किती सिमकार्ड? जाणून घ्या...

तुम्हाला जर नवीन सिमकार्ड खरेदी करायचे असेल, तर त्यासाठी तुम्हाला तुमच्या आधार कार्ड किंवा वोटर आयडी कार्डची गरज भासते. बऱ्याचदा आपल्या मनात अनेकवेळा अशी शंका येते की, आपल्या नावावर दुसरे कोणी सिमकार्ड तर वापरत नाही ना? तुमच्या मनातदेखील अशी शंका येत असेल तर आता चिंता करायची गरज नाही, कारण आता तुम्ही अगदी सोप्या पद्धतीने फक्त एका मिनिटात तुमच्या नावावर किती सिमकार्ड चालू आहेत हे अगदी सहज तपासू शकता. आम्ही तुम्हाला अशा काही सोप्या टिप्स सांगणार आहोत ज्याचा अवलंब करुन तुम्हीही माहिती अगदी एका मिनिटात मिळवू शकता.

तसेच काही वेळेस मोबाईल फोन हरवल्यानंतर नवीन सिम मिळते. तुमचा मोबाइल हरवण्यासोबतच तुमचे सिमदेखील जाते. जर तुमचे जुने सिम तुमच्या आधार क्रमांकाशी लिंक असेल आणि त्यातून काही गैरप्रकार घडत असतील तर तुमच्या सिमकार्ड आधार लिंक असल्यामुळे तुम्ही पोलिसांच्या चौकशीत येऊ शकतात. त्यासाठी तुमच्या आधार क्रमांकाशी किती मोबाईल सिम लिंक आहेत हे एकदा तपासणे गरजेचे आहे. तसेच तुम्ही वापरत नसलेले सिम किंवा हरविलेले सिम त्वरीत बंद करणे गरजेचे आहे. जर तुम्हाला असे दिसून आले की, तुमची माहिती वापरून कोणी सिमकार्ड विकत घेतले आहे आणि ते वापरत आहे. तर तुम्हाला आता चिंता करायची गरज नाही. तुम्ही आता त्याची माहिती ऑनलाइन स्वरूपात मिळवू शकता. त्याचसोबत तुम्ही ती सिमकार्डही ब्लॉक करू शकता. अशाप्रकारे सिम ब्लॉक करु शकता. सर्वात प्रथम https://tafcop.dgtelecom.gov.in/alert.php या पोर्टलवर लॉगिन करा. यानंतर तुमचा नंबर टाका आणि पोर्टलवर ओटीपी नमूद करा. आता तुम्हाला स्क्रीनवर सक्रिय कनेक्शनची माहिती दिसेल. येथे तुम्ही अशा क्रमांकांना ब्लॉक करण्यासाठी विनंती पाठवू शकतात, ज्याबद्दल त्यांना माहिती नाही.

# कुशल मराठी लेखक गंगाधर खानोलकर



वडिलांच्या व्यावसायिक बदल्यांमुळे गंगाधर खानोलकरांचे बालपण भ्रमंतीत गेले. त्यांचा जन्म १९ ऑगस्ट १९०३मध्ये झाला. प्राथमिक शिक्षण घरीच झाले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण सावंतवाडी व मालवण येथे टोपीवाला हायस्कूलमध्ये झाले. असहकार चळवळीत सहभागी झाल्याने ते मॅट्रिक परीक्षेस बसले नाहीत. पिता ज्ञानपिपासू, ग्रंथप्रेमी व माणुसकी हा एकच धर्म मानणारा आणि आई स्वाभिमानी, स्वावलंबी व त्यागी. या उभयतांचे दृढ संस्कार होऊन १९२० ते १९२३ या काळात गंगाधर यांनी रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनमधील विश्वभारती विद्यापीठात, निसर्गाच्या मोकळ्या वातावरणात वाङ्मयाचा विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होऊन अनेक थोर विद्वानांचे व गुरू या नात्याने रवींद्रनाथांचे मार्गदर्शन प्राप्त केले. खूप वाचन, चिंतन-मननाची सवय लावून घेतली. तेथील निखळ ज्ञानसाधकी शैक्षणिक संस्कारांची शिदोरी त्यांनी आयुष्यभर केलेल्या साहित्य सेवेत त्यांना सतत प्रेरणा देत राहिली.

यानंतर अमळनेर तत्त्वज्ञान मंदिरात शिष्यवृत्ती घेऊन दोन वर्षे तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून त्यांनी काहीकाळ तळेगावच्या राष्ट्रीय विचाराच्या समर्थ विद्यालयात शिक्षक या नात्याने काम केले. त्यानंतर ते मुंबईच्या वृत्तपत्राच्या दुनियेत 'लोकहित', 'विविधवृत्त', 'प्रगती', 'रणगर्जना साप्ताहिक' इत्यादी वृत्तपत्रांचे संपादक झाले. १९२६च्या सुमारास मुंबईत स्थिर झाल्यावर ते वाङ्मयीन चळवळीशी जोडले गेले. त्यांनी स्वतः अनुभवलेली संदर्भ-साहित्याची अडचण व उणीव दूर करण्यासाठी संशोधन क्षेत्रातील साधन साहित्याचा संग्रह सुरू केला आणि कोशकार, विश्लेषक, चरित्रलेखक,

**निमित्त**

ग्रंथसंपादक म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अविस्मरणीय अशी कामगिरी करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा ठसा उमटविला व पुढील पिढ्यांसाठी एक आदर्श निर्माण केला.

गंगाधर खानोलकर यांनी काही नोकऱ्याही केल्या, त्याही मुद्रण-प्रकाशन संस्थेतच. १९३१मध्ये त्यांनी 'अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक' चरित्रकोशाच्या लेखनाचा शुभारंभ केला. जानेवारी १९३३मध्ये सुरू केलेल्या 'प्रतिभा' पाक्षिकाचा उद्देश 'महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील वाङ्मयविषयक चळवळींची माहिती प्रसिद्ध करणे, प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाची चर्चा, ग्रंथलेखन, ग्रंथप्रकाशन, ग्रंथमुद्रण याविषयींचे विचार प्रसिद्ध करणे व मराठी वाङ्मयाच्या एकंदर प्रगतीस सहाय्यक होईल असा मतप्रचार करण हा होतो. पुढे ८ एप्रिल १९४०पासून 'समिक्षक' पाक्षिक व ३१ ऑक्टोबर १९४८पासून 'रविकिरण' साप्ताहिक चालू केले. मराठीतील पूर्णतः वाङ्मयीन स्वरूप असलेल्या पहिल्या-वहिल्या नियतकालिकाच्या संपादनात के. ना. काळे व वि. ह. कुलकर्णी यांचा सहभाग होता. यासोबत 'प्रतिभा प्रकाशन मंडळ' निघून त्या उत्साही वातावरणात माधवराव पटवर्धन, गिरीश, यशवंत, श्री. बा. रानडे, खं. सा. दौंडकर, माडखोलकर, खांडेकर, श्री. के. क्षीरसागर अशांशी सहवास व विचारांची देवाणघेवाण होऊन साहित्याची जाण परिपक्क झाली व परिणामी उपकारक ठरली. यानंतरच्या 'रविवार' साप्ताहिकात सर्वसामान्यांसाठी आकर्षक अशा विविध विषयांचा समावेश असे.

प्रत्येक नियतकालिक भिन्न प्रकृत्तीचे, पण दर्जेदार असे व अभिरुचिसंपन्न असे. आर्थिक समस्येमुळे पहिली दोन नियतकालिके अन्य चालकांकडे द्यावी लागली. तिसरे सव्वा वर्ष चालले. वयाच्या १८व्या वर्षी त्यांनी लेखनाला सुरुवात केली. नामांकित नियतकालिकांतून कथा, वाङ्मयविषयक लेख प्रकाशित केले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे त्यांचे लेखन क्षेत्रातले गुरू होत. रम्य भावाविष्काराच्या त्यांच्या कथा 'प्रेम आणि विद्वत्ता व इतर कथा या संग्रहात समाविष्ट आहेत. त्यांनी आयुष्यभर मराठी वाङ्मयाची सेवा केली.

**-वि. ग. जोशी**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : गणेशोत्सव जवळ आल्याने ढोलकी विक्रीसाठी राजस्थानमधील ढोलकीवाले शहरात दाखल झाले आहेत. गणेशोत्सवात आरती, भजनात ढोलकीला प्राधान्य असते. ग्रामीण भागातही हे ढोलकीवाले आता पोचले आहेत.**

## आरोग्य प्रहर



### 'या' सवयींमुळे तुम्ही बनता लठ्ठपणाचे शिकार!

लठ्ठपणा ही आजच्या काळातील मोठी समस्या आहे. सतत संगणकावर बैठी काम करणे, खाद्यपदार्थांमध्ये जंक फूडचा भडीमार, जेवणाचे बिघडलेले वेळापत्रक, पुरेसा व्यायाम न करणे या आणि अशा बऱ्याच गोष्टींमुळे सध्या लठ्ठपणा ही समस्या सर्वांना सतावत आहे. लठ्ठपणामध्ये केवळ बाहेरून शरीराचा आकार बदलत नाही तर त्यामुळे अनेक आजारांना आमंत्रण दिले जाते. लठ्ठपणामुळे टाईप दोन मधुमेह, कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब या आजारांना तुम्ही बळी पडू शकता. त्यामुळे लठ्ठपणावर ताबा मिळविणे आवश्यक आहे. लठ्ठपणावर नेमका उपाय काय करावा हे बऱ्याच जणांना माहित नसते. डायट करून म्हणजेच खाण्यावर नियंत्रण ठेवूनही काही जणांचे वजन कमी होत नाही. अनेक पथ्य पाळूनदेखील वजनात काही फरक दिसत नाही. कारण नकळतपणे आपल्या काही सवयी वजन वाढवण्यास मदत करत असतात. त्या सवयी कोणत्या आहेत जाणून घेऊया.

शिळे अन्न खाणे शरीरासाठी अपायकारक ठरू शकते. पूर्णपणे शिजलेले आणि ताजे अन्न शरीराला निरोगी ठेवते. तर शिळे अन्न खाल्याने शरीरातील फॅट बर्न होण्याची क्षमता कमी होते, परिणामी वजन वाढू शकते. नियमित व्यायाम करणाऱ्या व्यक्तींचे वजन लगेच कमी होते. म्हणजेच वजन कमी करण्यासाठी शरीराची हालचाल करणे आवश्यक आहे. केवळ जिमला जाऊन किंवा कठीण व्यायाम करूनच वजन कमी करता येते असे नाही. तुम्ही दररोज किमान २० मिनिटांसाठी चालु शकता. त्यामुळे तुमच्या शरीराची हालचाल होईल. वजन कमी करण्यासाठी शरीरातील कॅलरी बर्न होणे आवश्यक असते. बरेच जण दिवसभर एका ठिकाणी बसून काम करतात, त्यामुळे शरीराची हालचाल होत नाही. यावर उपाय म्हणजे वजन कमी करण्यासाठी थोडा वेळ काढून शरीराची हालचाल करावी. प्रथिनेयुक्त अन्नपदार्थ वजन कमी करण्यासाठी मदत करतात. प्रथिनेयुक्त पदार्थमध्ये डाळी, बदाम, काजू, अक्रोड, पिस्ता यांचा समावेश होतो. प्रथिने, फायबर, विटामिन आणि कार्बोहाइड्रेट यांचा समावेश असलेले अन्न खाल्ल्याने वजन नियंत्रणात राहते. प्रत्येक व्यक्तीने किमान सात ते आठ तास झोप घेणे आवश्यक असते. पुरेशी झोप न घेतल्याने वजन वाढू शकते. दरम्यान, येथे देण्यात आलेली माहिती घरगुती उपाय आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक माहितीकरिता आपल्या आहार तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# खोपोलीत आढळला डेंग्यूसदृश्य रुग्ण

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील बाजारपेठेत मोबाईल कव्हरची विक्री करणाऱ्या अरविंद कुमार याला डेंग्यू सदृश्य रोगाची लागण झाल्याची माहिती समोर येत आहे. या वृत्ताने खोपोली शहरात खळबळ उडाली आहे.

अरविंद कुमार हा मूळचा कल्याणचा रहिवासी असून तो सध्या खोपोलीत राहत आह. बाजारपेठेतील सार्वजनिक मुतारीच्या भिंतीजवळ तो मोबाईल कव्हर्स व इतर वस्तूंची विक्री करतो. खोपोली शहरात सध्या सर्दी, खोकल्याची मोठ्या प्रमाणात साथ असून खाजगी तसेच सरकारी दवाखान्यात याबाबतचे रुग्ण आढळून येत आहेत. अरविंद कुमार एका खाजगी दवाखान्यात तपासण्यासाठी गेला असता त्याला शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला. त्याच्या रक्ताचा नमुना शासकीय दवाखान्यात पाठवण्यात आल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे त्याला डेंग्यू झाला असे अधिकृत सांगता येत नाही. रक्त तपासणीचा अहवाल आल्यानंतरच अधिकृत निदान सांगता येईल, असे रुग्णालयातून सांगण्यात आले.

दरम्यान, या ठिकाणी मोबाईल कवर इतर विक्रीसाठी अरविंद कुमार बसतो त्याच्या शेजारीच बाजारपेठेतील सार्वजनिक मुतारी आहे. संपूर्ण बाजारपेठेत एकमेव असणाऱ्या या सार्वजनिक मुतारीचा वापर दररोज हजारो नागरिक करतात. त्यामुळे या ठिकाणी नेहमीच अस्वच्छता व दुर्गंधीचा नेहमी त्रास होत असल्याचे परिसरातील व्यापाऱ्यांचा आरोप आहे. केव्हा तरी तक्रार केल्यानंतर नगर परिषदेच्या आरोग्य विभागाला जाग येते व त्यावेळेस मुतारीची स्वच्छता केली जाते. नगर परिषदेच्या आरोग्य विभागाने या ठिकाणी तात्काळ व नियमीत औषध फवारणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.


(छाया : विनायक माडपे)

दरम्यान, मागील महिन्यात अतिमुसळधार पावसामुळे शहरातील अनेक सखल भागात पाण्याची डबकी तयार झाली आहेत. तसेच परिसरात रानटी गवत वाढल्यामुळे ही मच्छर व डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. खोपोली नगर परिषदेने शहरामध्ये तात्काळ औषध फवारणी करावी, अशी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# रेवदंडा समुद्रकिनारी स्वच्छता अभियान

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वच्छ सागर, सुरक्षीत सागर उपक्रम अंतर्गत साळाव येथील जेएसडब्ल्यू आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या सयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १७) रेवदंडा समुद्र कनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

रेवदंडा पारनाका येथून स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला. मेरीटाईम बोर्डचे रेवदंडा बंदर पोर्ट इन्स्पेक्टर सतिश देशमुख, पोर्ट इस्पेक्टर कुबारू, राहूल धायगडे, राम कैवारी, जेएसडब्ल्यू कंपनीचे मॅनेजर भानुप्रसाद, सीएसआर विभाग प्रमुख राम मोहिते, एम. जी. पाटील, कृष्णा धुमाळ, संतोष नांदगावकर, रसिका काळे, राकेश चवरकर, प्रिया वर्तक, तसेच राजेंद्र बैकर, राजेश तांबडे, राजेंद्र किचड, प्रितिज हाले, रत्नाकर घाग, आज्ञेश पाटील, सतिश कांनुगो यांच्यासह विद्यार्थी व नागरिक या अभियानात सहभागी झाले होते.

(छाया : महेंद्र खैरे)




## -: जाहीर सूचना :-

सर्व हितसंबंधित व्यक्तिंना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ डीडी चे रुंदीकरण करण्यासाठी महाड तालुक्यातील मौजे ओवळे या गावातील जमिन संपादीत होत आहे. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A अधिसूचना हिंदी व इंग्रजीमध्ये भारत राजपत्रात दिनांक १६/०४/२०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**स्थळ :- महाड**

**दिनांक :- १७/०८/२०२२**

**सही/-**
**(प्रतिमा पुदलवाड - शेंगुलवार)**
**सक्षम प्राधिकारी**
**तथा उपविभागीय अधिकारी**
**महाड उपविभाग महाड**

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 | REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-07042022-234924
CG-DL-E-07042022-234924

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 1579] नई दिल्ली, बुधवार, अप्रैल 6, 2022/चैत्र 16, 1944
No. 1579] NEW DELHI, WEDNESDAY, APRIL 6, 2022/CHAITRA 16, 1944

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

नई दिल्ली, 16 अप्रैल, 2022

**का.आ. 1662(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH965DD के कि.मी. 49.5 से कि.मी. 96.307 (सदो ऑफिस महद ) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् सुब डिविशनल अफसर को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH965DD के कि.मी. 49.5 से कि.मी. 96.307 (सदो ऑफिस महद ) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | जिले का नाम: रायगड | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: महाड | | | | | |
| गांव का नाम: ओवळे | | | | | |
| 1 | 15/3 | निजी | ड्राई | 0.0150000(हेक्टेयर) | 0.0150000 |
| 2 | 42/1 | निजी | ड्राई | 0.0080000(हेक्टेयर) | 0.0080000 |
| 3 | 42/2 | निजी | ड्राई | 0.0560000(हेक्टेयर) | 0.0560000 |
| 4 | 42/3 | निजी | ड्राई | 0.0380000(हेक्टेयर) | 0.0380000 |
| 5 | 42/4 | निजी | ड्राई | 0.0070000(हेक्टेयर) | 0.0070000 |
| 6 | 44/1 | निजी | ड्राई | 0.0110000(हेक्टेयर) | 0.0110000 |
| 7 | 45/1 | निजी | ड्राई | 0.0240000(हेक्टेयर) | 0.0240000 |
| 8 | 45/2 | निजी | ड्राई | 0.0250000(हेक्टेयर) | 0.0250000 |
| | | | कुल | 0.1840 | 0.1840 |

[फा. सं. RW/NH-12014/154/2017-MAH-Zone IV/3A ]

राजेश गुप्ता, निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**

**NOTIFICATION**

New Delhi, the 16th April, 2022

**S.O. 1662(E).**—In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH965DD in the stretch of land from Km. 49.000 to Km. 73.250 (SDO Office mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer mahad in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

**Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH965DD in the stretch of land from Km. 49.000 to Km. 73.250 (SDO Office mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA.**

| State: MAHARASHTRA | District: RAIGAD | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey / Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectare) |
| Taluk: Mahad | | | | | |
| Village: Owale | | | | | |
| 1 | 15/3 | Private | Dry | 0.0150000(Hectare) | 0.0150000 |
| 2 | 42/1 | Private | Dry | 0.0080000(Hectare) | 0.0080000 |
| 3 | 42/2 | Private | Dry | 0.0560000(Hectare) | 0.0560000 |
| 4 | 42/3 | Private | Dry | 0.0380000(Hectare) | 0.0380000 |
| 5 | 42/4 | Private | Dry | 0.0070000(Hectare) | 0.0070000 |
| 6 | 44/1 | Private | Dry | 0.0110000(Hectare) | 0.0110000 |
| 7 | 45/1 | Private | Dry | 0.0240000(Hectare) | 0.0240000 |
| 8 | 45/2 | Private | Dry | 0.0250000(Hectare) | 0.0250000 |
| | | | Total | 0.1840 | 0.1840 |

[F. No. RW/NH-12014/154/2017-MAH-Zone IV/3A]

RAJESH GUPTA, Director

क्र.जिमाका/राज/जाहि./९२/२०२२-२३

# जिल्ह्यात सरासरीच्या ८०.७६ टक्के पाऊस

**अलिबाग : प्रतिनिधी**

वरुणराजा ऐन श्रावणात आषाढासारखा बरसत आहे. जोरदार पावसामुळे नद्या, नाले, धरणे वाहू लागली आहेत. जिल्ह्यात गुरुवारी (दि. १८) सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये सरासरी २०.०२ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. यंदा १ जून ते १८ ऑगस्ट या कालावधीत सरासरी दोन हजार ५०४.८१ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. जिल्ह्याच्या वार्षिक पर्जन्यमानाच्या ८०.७६ टक्के पाऊस पडल आहे. पावसाचा अजून एक महिना बाकी आहे. त्यामुळे यंदा १०० टक्के पाऊस होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

**पावसाची तालुकानिहाय टक्केवारी**

***अलिबाग ७८.८० टक्के, पेण ८२.२१, मुरुड ७४.३७, पनवेल ७९.९७, उरण ७८.५२, कर्जत ८१.८८, खालापूर ७९.२६, माणगाव ६७.१४ ८२.९४, सुधागड ६८.८६, तळा ८३.५०, महाड ७१.२०, पोलादपूर ७२.६२, म्हसळा ७१.९१, श्रीवर्धन ८५.९१, माथेरान १३९.११. एकूण : १२९८.१८. सरासरी : ८०. ७६ टक्के.***

जिल्ह्यात पावसाला काहीशी उशिरा सुरुवात झाली. सरासरी ६४३.२० मिमी पाऊस पडतो. यंदा जून महिन्यात ३५७.२२ मिमी पाऊस पडला, मात्र जुलै महिन्याच्या मध्यात पावसाचे जोरदार आगमन झाले.

जून महिन्याची तुट पावसाने जुलै महिन्यात भरून काढली. जुलै महिन्यातील पावसाची सरासरी ११५९.२७ मिमी आहे. मात्र यंदा जुलै महिन्यात १४६०.२५ मिमी पाऊस पडला. जुलै महिन्याच्या सरासरीच्या १२५.९६ टक्के पाऊस पडला. ऑगस्ट महिन्याची सरासरी ८७४.५० मिमी आहे. १८ ऑगस्टपर्यंत ६८७.३४ मिमी पाऊस पडला आहे. ऑगस्ट महिन्याच्या सरासरीच्या ७८.६० टक्के पाऊस पडला आहे.

रायगड जिल्ह्यात मागील वर्षी १८ ऑगस्ट अखेरपर्यंत एकूण सरासरी दोन हजार ७७८.८६ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली होती. यंदा १८ ऑगस्टपर्यंत सरासरी दोन हजार ५०४.८१ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. पावसाचा अजून एक महिना बाकी आहे. त्यामुळे यंदा १०० टक्के पाऊस पडेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

माथेरानमध्ये पावसाने ऑगस्ट महिन्यातच वार्षिक सरासरी ओलांडली आहे. १८ ऑगस्टपर्यंत माथेरानमध्ये सरासरीच्या १३९.११ टक्के पाऊस पडला आहे.

# विजेचा धक्का लागून पाच म्हशींचा मृत्यू

## कर्जतच्या वंजारवाडी येथील शेतकऱ्याचे नुकसान

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वंजारवाडी येथील एका शेतकऱ्याच्या पाच म्हशींना जिवंत वीज वाहिनीचा धक्का लागून त्या जागीच मरण पावल्या. या पाच म्हशींची किंमत सुमारे चार लाख रुपये असून महावितरण कंपनीने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करीत आहे.


(छाया : विजय मांडे)

कर्जत तालुक्यातील वंजारवाडी येथील चंदू भारद्वाज हे शेतकरी गेल्या वीस-बावीस वर्षांपासून शेती व दुग्धव्यवसाय करीत आहेत. त्यांच्याकडे १२ म्हशी होत्या. सकाळच्या सुमारास गोठ्याची साफसफाई करण्यासाठी म्हशींना बाहेर सोडले होते. थोड्या वेळानंतर त्यांना आणण्यासाठी गेले असता पाच म्हशी मृत झाल्याचे आढळल्या. म्हशी चरत असताना जिवंत वीजवाहिनी तुटून म्हशींच्या अंगावर पडली व त्यामुळे पाच म्हशी मृत झाल्याचे त्यांच्या निदर्शनात आले. त्यातील दोन म्हशी दुभत्या तर दोन म्हशी गाभण होत्या. उर्वरित सात म्हशी दुसऱ्या जागी चरत असल्यामुळे त्या वाचल्या.

> **महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे सुमारे चार लाख रुपये किंमतीच्या म्हशी मृत झाल्या असून त्याची नुकसान भरपाई मिळावी.**
> **-चंदू भारद्वाज, शेतकरी, वंजारवाडी, ता. कर्जत**

(छाया : सलीम शेख)


# रातवड विद्यालयात सामूहिक राष्ट्रगीत गायन

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ-कल्याण या संस्थेच्या रातवड (ता. माणगाव) येथील माध्यमिक विद्यामंदिर शाळेत बुधवारी (दि. १७) स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारक आणि देशभक्तांना अभिवादन करण्यात आले. या वेळी विद्यालयात सकाळी ११ वाजता सामूहिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त १ ऑगस्टपासून रातवड विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना तलाठी विशाल वाघमारे यांच्या हस्ते बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. या वेळी तलाठी वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तसेच स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारक आणि देशभक्तांना उपस्थितांनी अभिवादन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# यश मिळवण्यासाठी जिद्द, चिकाटी, शिस्त आवश्यक -डॉ. कोकाटे मकबूल

## मुरूडमध्ये विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान

**मुरूड : प्रतिनिधी**

आपले आयुष्य सफल व यशस्वी बनवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व शिस्त बाळगणे खूप आवश्यक आहे. वेळेचा उपयोग सुयोग्य पद्धतीने केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मकबूल कोकाटे यांनी मुरुड येथे केले.


(छाया : संजय करडे)

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मुरुड तहसील कार्यालयाने तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्त्व, चित्रकला आदि विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यात सुमारे तीन हजार दोनशे विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धांचा पारितोषीक वितरण समारंभ शहरातील माळी समाज सभागृहात झाला. त्यावेळी डॉ. कोकाटे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते.

प्रत्येक विद्यार्थ्याने देश प्रेम बाळगणे खूप आवश्यक आहे. सकारात्मक विचार करा, म्हणजे कोणतेही कठीण काम सोपे होईल, असा सल्ला कोस्टगार्डचे कमांडिंग ऑफिसर ए. व्ही. मुसळे यांनी या वेळी दिला. नायब तहसीलदार अमित पुरी यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तहसीलदार रोहन शिंदे, नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे, गटविकास अधिकारी सुभाष वाणी, माजी नगरसेवक विश्वास चव्हाण, नगर परिषदेच्या प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, कोस्टगार्डचे कमांडिंग ऑफिसर अरुणकुमार सिंग, विजय टाटा यांच्यासह विद्यार्थी व पालक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्नीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या आरोपीला बिहारमधून अटक

## पेण पोलिसांची कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील वाशीनाका येथील विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त करून तिच्या मृत्यूनंतर फरार झालेल्या आरोपी पती मोहन रामअवतार यादव (वय ३८) याला पेण पोलिसांनी बिहारमधील झांझा, जिल्हा- जमुई येथून अटक केली आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी रुपेश चंद्रकांत म्हात्रे (वय ३०, रा. सरेभाग, वाशी ता. पेण) याची बहिण आणि मोहन यादव यांचा विवाह ११ वर्षांपूर्वी झाला होता. विवाहानंतर मोहन यादव याने दारू पिऊन पत्नीला मारहाण तसेच तिचा शारीरिक छळ सुरू केला. या त्रासाला कंटाळून त्याच्या पत्नीने २९ जुलै २०२२ रोजी विषारी औषध प्राशन केले. तिला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तिचा मृत्यू झाला. तेव्हापासून आरोपी मोहन यादव फरार होता.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात आरोपी पती मोहन यादव याच्या विरोधात भादंवि कलम ३०६, ४९८अ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या सूचनेनुसार उपनिरीक्षक समद बेग, हवालदार राजेंद्र भोनकर, पोलीस शिपाई पुंडलिक कारखिले यांचे पथक आरोपीच्या तपासासाठी बिहारमध्ये गेले होते. गोपनीय व तांत्रिक बाबींच्या आधारे त्यांनी आरोपी मोहन यादवला नातेवाईक मुरारी यादव (रा. झाझा, जि. जमुई, बिहार) यांच्या घरातून ११ ऑगस्ट रोजी ताब्यात घेतले. आरोपीला १३ ऑगस्ट रोजी पेण पोलीस ठाण्यात आणण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली. अधिक तपास पेण पोलीस करीत आहेत.


(छाया : अनिस मनियार)

# पालीतील चौकाला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे नाव

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाली शहरामधील गुरवआळी व होळीचा माळ येथील चौकाला धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज चौक असे नाव देण्यात आले आहे. या चौकातील नामफलकाचे अनावरण नगराध्यक्षा गीता पालरेचा व सेवानिवृत्त सैनिक अतिष सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.


(छाया : धम्मशील सावंत)

पालीतील गुरवआळी व होळीचा माळ चौकाला धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी हिंदू जनजागृती समिती पाली व सामाजिक कार्यकर्ते ओमकार प्रमोद खोडागळे तसेच गुरव समाजाने नगरपंचायत प्रशासनाकडे केली होती. त्यानुसार सोमवारी या चौकाला धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात आले. तहसीलदार दिलीप रायन्नावर, माजी उपसरपंच संगीता खोडागळे व नगरसेविका जुईली ठोंबरे यांच्यासह अनेक महिलांच्या हस्ते नामफलकाचे पूजन करण्यात आले.

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, तालुका युवासेना अधिकारी किरण पिंपळे, नगरसेवक सुधाकर मोरे, पराग मेहता, सुधीर भालेराव, सुलतान बेनसेकर, विक्रांत चौधरी, निलेश धारिया, संदेश सोनकर आदीसह नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी उमेश मढवी, विद्वेश आचार्य, नागेश आंबेकर, शुभम मिसळ, श्रीकांत ठोंबरे, सूरज गुप्ता, स्वराज मेहता यांनी विशेष मेहनत घेतली.

# खोपोली कोमसापच्या बाल विभागाचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या उपजत कलांना वाव देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे. ज्या विषयाची आवड आहे, तोच विषय निवडावा, त्यामुळे भविष्यात चांगला मार्ग सापडतो, असे प्रतिपादन कोमसापचे कार्याध्यक्ष प्रा. प्रदीप ढवाळ (ठाणे) यांनी खोपोली येथे बुधवारी (दि. १७) केले.


(छाया : विनायक माडपे)

कोमसापच्या खोपोली शाखेच्या बाल विभागाचे उद्घाटन बुधवारी प्रा. प्रदीप ढवाळ यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी व्हिडिएम स्कूलचे अध्यक्ष उल्हासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रा. ढवाळ बोलत होते. या वेळी त्यांनी शिक्षण क्षेत्रातील नवनवीन उपक्रमांबद्दलची माहिती दिली व आपल्या आयुष्यातील अनेक किस्से सांगितले.

प्रारंभी कोमसाप खोपोली शाखेच्या अध्यक्ष उज्ज्वला दिघे यांनी स्वागत केले. विद्यार्थ्यांनी स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कष्ट करण्याची तयारी ठेवावी तसेच आपल्या शिक्षकांबद्दल नेहमीच कृतज्ञता बाळगावी, असे आवाहन उल्हासराव देशमुख यांनी या वेळी केले.

या कार्यक्रमाला कोमसाप जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी, सदस्या मधुमती पाटील, बाल विभागाचे प्रमुख प्रकाश राजोपाध्ये, रेखा कोरे, अण्णासाहेब कोरे कोमसाप सदस्या मधुमती पाटील, र. वा. दिघे यांचे सुपुत्र वामन दिघे, व्हिडिएम स्कूलच्या संचालिका सौ. देशमुख, पत्रकार संजय पाटील प्रशांत गोपाळे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

दरम्यान, कोमसापच्या बाल विभागातर्फे सामुदायिक गायन स्पर्धा घेण्यात आल्या, त्यात खोपोली शहरातील विविध शाळातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

# वढाव येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव सप्ताह

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वढाव येथील राधाकृष्ण देवस्थान ट्रस्टच्या श्रीकृष्ण जन्मोत्सव सप्ताह सोहळ्यास प्रारंभ झाला आहे. उत्सवात रोज रात्री गोपाळकृष्णाला प्रदक्षिणा व कीर्तनाचा कार्यक्रम होत आहे.

नारळी पौर्णिमेपासून वढाव येथील श्रीकृष्ण जन्मोत्सव सप्ताहाला सुरुवात होते. यात रोज काकड आरती, पूजा, अभिषेक, प्रवचन, हरिपाठ व धार्मिक कार्यक्रम होतात.

गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी छबिना निघतो. राधाकृष्ण मंदिराजवळ दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला जातो. यंदा शुक्रवारी (दि. १९) सकाळी १० वा. श्रींचा पाळणा महोत्सव, शनिवारी हभप मंदार गोखले यांचे कीर्तन, श्रींचा छबिना महोत्सव, रविवारी ललिताच्या कीर्तनाने सप्ताहाचा समारोप होणार आहे.

# 'मुक्तांगण'मधील विद्यार्थिनींनी बांधल्या पत्रकारांना राख्या



**महाड : प्रतिनिधी**

शहरातील मुक्तांगण या गतीमंद मुलांच्या शाळेत बुधवारी (दि. १७) पत्रकारांसाठी रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शाळेतील विद्यार्थीनींनी उपस्थित पत्रकारांना राख्या बांधल्या.

महाड शहर आणि तालुक्यातील मतीमंद मुलांच्या शिक्षणासाठी मंजुषा साबळे यांनी पुढाकार घेवून मुक्तांगण ही शाळा सुरु केली आहे. या मतीमंद शाळेत बुधवारी रक्षाबंधन कार्याक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार तसेच चंद्रकांत कोकणे, महेश शिंदे, मनोज खांबे, श्रीकृष्ण बाळ, प्रसाद पाटील, इलियाज ढोकले, उदय सावंत, श्रीकांत पार्टे, 'हिरवळ' चे बुटाला आदी उपस्थित होते. त्यांना शाळेतील विद्यार्थीनींनी राख्या बांधल्या. चंद्रकांत कोकणे, श्रीकृष्ण बाळ यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेच्या शिक्षिका मंजुषा साबळे, श्रद्धा चोरगे, अनामिका शिरशीवकर, पूनम जाधव आदींनी या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.


**पनवेल महानगरपालिका**
**पाणी पुरवठा विभाग** दि.- १७/०८/२०२२
**''नागरिकांना जाहीर सूचना'' (दवंडी)**

पनवेल शहरातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडील पाणीपुरवठा सोमवार दि. २२/०८/२०२२ रोजी सकाळी ९.०० ते मंगळवार दि. २३/०८/२०२२ रात्री १२.०० वाजेपर्यंत (४० तास) पाईपलाईन दुरूस्ती कामी बंद राहणार आहे. त्यामुळे पनवेल शहरात सदर दिवशी पाणी पुरवठ्यात कपात करून एक-एक तास पाणी पुरवठा करण्यात येणार असून पाणीपुरवठा अवेळी होणार आहे. तसेच सदर दिवशी मार्केट यार्ड उंच जलकुंभातून पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

तरी नागरिकांनी मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**सही/-**
**संजय जगताप**
**(शहर अभियंता)**
**पनवेल महानगरपालिका**


# रोह्यात गणेशभक्तांची लगबग वाढली

## आर्टिफिशियल डेकोरेशन खरेदीसाठी होतेय गर्दी



**रोहे : महादेव सरसंबे**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने रोह्यात गणेशभक्तांची गणेशमुर्ती, सजावट साहित्य खरेदी व अन्य कामांसाठी लगबग सुरू झाली आहे.

सजावटीच्या साहित्याने रोहा बाजारपेठ सजली आहे. शहरात आर्टिफिशियल डेकोरेशचे साहित्य व रेडीमेड डेकोरेशन उपलब्ध झाल्याने त्यांची मागणी वाढली आहे. काही तरी वेगळे डेकोरेशन करण्याची तयारी असलेल्या गणेशभक्तांना हा पर्याय रोह्यातील शरद पवार भवन येथील व्यावसायीक गाळ्यात उपलब्ध झाला आहे. रोह्यात विजय कुरणकर, महेंद्र कोमनाक, संतोष बामणे, सुधाकर क्यादरकुंठे यांनी आर्टिफिशियल डेकोरेश विक्रीसाठी ठेवली असून त्यामध्ये गणपतीसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या मखरांचा समावेश आहे. हे डेकोरेशन कमीतकमी तीन वर्षे टिकणारे असून त्यात वापरण्यात असलेल्या फुलांचा रंगही उडत नसल्याने गणेशभक्तांना ते मखर सोयीचे ठरत आहे. हाफ सर्कल, धनुष्याकृती, भिंतीलगत लावण्याचे अशी अनेक प्रकारचे मखर, तसेच एक ते तीन फुट लांबीची फुलांची तोरणे रोहा बाजारपेठेत विक्रीसाठी आली आहेत. त्याची किंमतही वाजवी आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-5/22-23 7000024345 | AMC for internal inspection of T/F ICT and attending oil leakage through HV & LV bushing with oil filtration at various substation under EHV (O&M) Circle, Panvel for F.Y. 2022-23 and 2023-24 | Limited to Rs. 100/- Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 18.08.2022 to 25.08.2022 up to 23:59 hrs, Opening date:-26.08.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# टीम इंडियाची विजयी सलामी

## झिम्बाब्वेवर दहा गडी राखून सहज विजय; धवन, गिलची अर्धशतके

**हरारे : वृत्तसंस्था**

भारत आणि झिम्बाब्वे क्रिकेट संघांदरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला गुरुवार (दि. १८)पासून सुरुवात झाली. या मालिकेतील पहिला सामना हरारे येथील हरारे स्पोर्ट्स क्लब मैदानावर खेळवला गेला. या सामन्यात भारताने यजमान झिम्बाब्वेचा दहा गडी राखून सहज पराभव केला. सलामीवीर शुबमन गिल आणि उपकर्णधार शिखर धवन यांनी १९२ धावांची भागीदारी केली. या विजयामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतलीय.

प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने भारतासमोर १९० धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात भारताने ३०.५ षटकांत एकही गडी न गमावता १९२ धावा केल्या. यजमानांनी विजयासाठी दिलेले १९० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी शिखर धवन आणि शुबमन गिल सलामीला मैदानात उतरले होते. त्यांनी अजिबात घाई न करता खेळ केला. झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना दोघांची जोडी फोडण्यात अपयश आले. शिखर धवनने ११३ चेंडूंत नाबाद ८१ आणि शुबमन गिलने ७२ चेंडूंत नाबाद ८२ धावा केल्या. या दरम्यान धवनने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील सहा हजार ५०० धावांचा टप्पा पार केला.

तत्पूर्वी भारतीय कर्णधार केएल राहुलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेचा संघ ५७ चेंडू शिल्लक असतानाचा सर्वबाद झाला. झिम्बाब्वेने ४०.३ षटकांत १८९ धावा केल्या आहेत. झिम्बाब्वेचा कर्णधार असलेल्या रेगिस चकाब्वाने सर्वाधिक ३५ धावा केल्या. भारताकडून वतीने अक्षर पटेल, दीपक चहर आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले, तर मोहम्मद सिराजने एक गडी बाद केला.

भारताचा हा झिम्बाब्वेविरुद्धचा सलग १३वा विजय आहे. प्रदीर्घ काळानंतर संघात पुनरागमन करून सात षटकांमध्ये तीन गडी बाद करणाऱ्या दीपक चहरला सामनावीरचा पुरस्कार देण्यात आला. मालिकेतील दुसरा सामना २० ऑगस्ट रोजी होणार आहे.

## 'आरटीआयएससी'ची बॅडमिंटनपटू रक्षा कंदास्वामीला रौप्यपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (आरटीआयएससी)ची बॅडमिंटनपटू रक्षा कंदास्वामी हिने पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले.

महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने सब ज्युनियर अंडर १५ व १७ राज्य निवड स्पर्धा नुकतीच पुणे येथे झाली. या स्पर्धेत आरटीआयएससीची रक्षा कंदास्वामी हिने अंडर १७ गटात रौप्यपदकावर नाव कोरले.

रक्षाला योगेश पाटील बॅडमिंटन अकॅडमीचे मार्गदर्शन लाभले. राज्यस्तरीय रौप्यपदकाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# नाशिकच्या १९ जणांनी पटकाविला आयर्न मॅन किताब



**नाशिक : प्रतिनिधी**

कझाकस्तानमध्ये झालेली आयर्न मॅन स्पर्धा जिंकून नाशिकच्या १९ जणांनी हा किताब पटकाविला आहे. अत्यंत खडतर आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत ही स्पर्धा पूर्ण करणाऱ्यांमध्ये प्रशांत डबरी, महेंद्र छोरीया आणि अरुण गचाले यांनी सलग तीन वेळेस जिंकत हॅट्ट्रिक साधली.

स्वीमिंग, सायकलिंग आणि धावणे यांचा समावेश असलेली आयर्न मॅन स्पर्धा जगभरात अनेक ठिकाणी आयोजित केली जाते. कझाकस्तानमध्ये आयोजित या स्पर्धेत नाशिकमधील १९ जणांनी सहभाग घेतला होता. एक, दोन; नव्हे तर सर्वच स्पर्धकांनी ही स्पर्धा पूर्ण करीत एक प्रकारे विक्रमच केला आहे.

### आयर्न मॅन किताबाचे मानकरी

डॉ. वैभव पाटील, डॉ. पंकज भदाणे, डॉ. दुष्यंत चोरडिया, डॉ. देविका पाटील, डॉ. अरुण गचाळे, किशोर काळे, माणिक निकम, अनिकेत झंवर, प्रशांत डाबरी, अश्विनी देवरे, नीलेश झंवर, नीता नारंग, आविष्कार गचाळे, निसर्ग भामरे, अरुण पालवे, महेंद्र छोरिया, किशोर घुमरे, विजय काकड, धीरज पवार.

आयर्न मॅन स्पर्धा पूर्ण करणाऱ्या नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातील महिला पोलीस अश्विनी देवरे यांचाही समावेश असून बहुधा त्या महाराष्ट्र पोलीस दलातील हा किताब पटकाविणाऱ्या पहिल्याच महिला पोलीस कर्मचारी असाव्यात, तर नाशिकचे डॉ. अरुण गचाळे यांनी त्यांच्या १७ वर्षीय मुलगा आविष्कारसमवेत या स्पर्धेत सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे या दोघांनी स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. आयर्न मॅनसारखी खडतर स्पर्धा पूर्ण करणारे हे पहिलेच पिता-पुत्र ठरले आहेत.

याशिवाय आयर्न मॅन स्पर्धेत ट्राय फिट झोन पिंपरी चिंचवड या ग्रुपमधील राम गोमारे, वैभव ठोंबरे, सचिन वाकडकर, अमित लोंढे, रोहित क्षीरसागर, पांडुरंग बोडके यांनी मानाचा किताब पटकावला. हा किताब मिळवल्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# मुख्याध्यापक चषक कबड्डी स्पर्धेत संघर्ष क्रीडा मंडळ विजेते

**मुरूड : प्रतिनिधी**



भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व यशवंतनगर नांदगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक चिंतामणी जोशी यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त स्वतंत्र दिन मित्र मंडळ आयोजित मुरूड तालुकास्तरीय मुख्याध्यापक चषक पावसाळी कबड्डी स्पर्धेत मजगावच्या संघर्ष क्रीडा मंडळाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी अंतिम फेरीत आदाडच्या गुरुमाऊली संघाचा अवघ्या एका गुणाने पराभव केला.

स्पर्धेत तिसरा क्रमांक वाळवटी गावच्या शिवशंभो क्रीडा मंडळाने, तर कोर्लईच्या माउंट कार्मेल संघाने चौथा क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू 'संघर्ष'चा रोजित माळी, उत्कृष्ट चढाईपटू संकेत पाटील, उत्कृष्ट कोपरारक्षक डेरल पेन्ना व उत्कृष्ट पकडपटू म्हणून मयूर घरत यांची निवड करण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस वितरण चिंतामणी जोशी यांच्या हस्ते झाले. सहजीवन विद्या मंडळाचे अध्यक्ष फेरोजशेठ घलटे, ॲड. इस्माईल घोले, मनोज भगत, अजित कासार, भाई सुर्वे, मुख्याध्यापक उत्तम वाघमोडे, पर्यवेक्षक श्रीधर ओव्हाळ, संतोष बुल्लु, प्रतीक पेडणेकर, मोहन पाटील, स्वातंत्र्य दिन मित्र मंडळ कबड्डी मंडळाचे अध्यक्ष सचिन पाटील व सदस्य आणि श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धा पाहण्यासाठी तालुक्यातील कबड्डीप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्वतंत्र दिन मित्र मंडळाचे सदस्य व शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## रायगड एक्स्प्रेस कै. सुधीर तांडेलला मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार जाहीर



**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील ज्या दिग्गज क्रिकेटपटूने संपूर्ण भारतासह देशाबाहेर जाऊनदेखील आपल्या अचूक टप्पाच्या गोलंदाजीची हुकूमत गाजवली असा विक्रमवीर रायगड एक्स्प्रेस फेम उरण तालुक्यातील जसखार गावचा सुपुत्र स्व. सुधीर तांडेल याला रायगड प्रीमियर लीगतर्फे मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

टेनिस क्रिकेटमधील खेळाडू सुधीर तांडेल याच्या जाण्याने क्रिकेटप्रेमींवर दुःखाचा डोंगर कोसळला होता. त्याची आठवण आजही अनेक क्रिकेटरसिकांना येत आहे. त्याचे नाव काढताच सर्व जण भावूक होतात.

या खेळाडूला रायगड प्रीमियर लीगतर्फे मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार देण्यात आल्याने समर्थक, मित्र परिवार, नातेवाईक व जसखार गावासह संपूर्ण जिल्ह्यातील क्रिकेट चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# उरणमध्ये फुटबॉल, मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात



**उरण : बातमीदार**

येथे फुटबॉल आणि मॅरेथॉन स्पर्धा झाली. फुटबॉल स्पर्धेत विरेश्वर खोपोली संघाने फुटबॉल प्रथम क्रमांक पटकाविला, तर जिल्हास्तरीय मॅरेथॉनमध्ये २१ किमीच्या पुरुष खुल्या गटात राज सरोदे आणि १० किमीच्या महिला खुल्या गटात ऋतुजा सिकवण यांनी बाजी मारली.

राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत मुंबई, मुंब्रा, खोपोली, पनवेल व उरण येथील एकूण १६ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात विरेश्वर खोपोली संघाने केएफए खोपोली संघाला १ विरुद्ध ० गोलने पराभूत करून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

१४ वर्षाखालील फुटबॉल स्पर्धेत १२ संघांनी सहभाग घेतला होता आणि यामध्ये द्रोणागिरी करंजा इंग्लिश मीडियम हायस्कूल संघ विजेता, तर मुळेखंड येथील कोळी किंग संघ उपविजेता ठरला.

वर्षा मॅरेथॉनमध्ये सहा हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. यातील २१ किमी पुरुष खुल्या गटात राज सरोदे प्रथम, स्वराज पाटील द्वितीय, राजेश तांबोळी तृतीय, प्रशांत घरत, सचिन कामत यांना उत्तेजनार्थ; १० किमी महिला खुल्या गटात ऋतुजा सिकवण प्रथम, सुजाता माने द्वितीय, मयुरी चव्हाण तृतीय, साक्षी पाटील, ईश्वरी चिर्लेकर यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला. विशेष विद्यार्थ्यांसाठी आयोजित २०० मीटर स्पर्धेत सिद्धांत पाटील प्रथम, दुर्वेश धोत्रे द्वितीय, निशांत कोळी तृतीय व यश रूपनर उत्तेजनार्थ यांनी यश संपादन केले.






## चंद्रकांत पंडित देणार केकेआर संघाला प्रशिक्षण

**मुंबई** : देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वांत यशस्वी प्रशिक्षकांपैकी एक असलेले चंद्रकांत पंडित आता इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) काम करताना दिसणार आहेत. कोलकाता नाईट रायडर्स संघाने (केकेआर) पंडित यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. न्यूझीलंडचा माजी कर्णधार ब्रेंडन मॅक्युलम आयपीएलच्या १५व्या हंगामानंतर प्रशिक्षकपद सोडले होते. दरम्यान, केकेआरचा सहमालक असलेल्या शाहरूख खानच्या मुलाने आपल्या संघाच्या नवनियुक्त प्रशिक्षकाचे स्वागत केले आहे. आर्यन खानने केकेआरचे नवीन मुख्य प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांचे सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वागत केले आहे. स्वागत आहे सर, आगामी हंगामापासून तुमच्या अनुभवाचा लाभ घेण्यासाठी खूप उत्सुक आहे. कोरबो लोर्बो जीतबो, अशी इन्स्टाग्राम स्टोरी आर्यनने शेअर केलीय.

# पीवायसी मैदानावर सचिन भारावला

**पुणे : प्रतिनिधी**



मास्टर ब्लास्टर फलंदाज सचिन तेंडुलकर काही दिवसांपूर्वी एका वैयक्तिक सोहळ्यासाठी पीवायसी हिंदू जिमखान्यावर आला होता. त्या वेळी नवे रूप धारण केलेल्या पीवायसीचे मैदान पाहून तो भारावून गेला. याचा व्हिडीओ सचिनने इन्स्टाग्रामवर टाकला असून माझ्या जुन्या आठवणींना उजाळा देणारा हा क्षण आहे, असे कॅप्शन सचिनने या व्हिडीओला दिले आहे.

सचिनने म्हटलेय की, पीवायसी मैदानाशी माझ्या अनेक आठवणी जोडल्या गेल्या आहेत. १५ वर्षांखालील गटात पहिलाच सामना मी या मैदानावर खेळलो. माझा शालेय सहकारी राहुल गणपुले फलंदाजी करीत होता. त्याने मला तिसरी धाव घेण्यासाठी हाक दिली. मी खूप वेगाने धावलो नाही आणि धावबाद झालो. माझ्या केवळ चार धावा झाल्या. अशा पद्धतीने बाद झाल्याने मी दुखावलो गेलो आणि रडायलाच लागलो. ड्रेसिंग रूममध्ये परतेपर्यंत मी रडतच होतो. त्या वेळी अब्दुस ईस्माईल मुंबई संघाचे व्यवस्थापक होते. मिलिंद रेगे आणि वासू परांजपे हे दिग्गजही या सामन्याला उपस्थित होते. त्यांनी मला धीर दिला आणि पुढील सामन्यांवर लक्ष केंद्रित कर असे सांगितले. आता मी ३५ वर्षांनी या मैदानावर परतलो आहे आणि हे मैदान पाहून मी भावूक झालो.

सचिनने आपल्या कारकिर्दीत २०० कसोटी, ४६३ एकदिवसीय आणि एक टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. त्याने कसोटीत ५३.७९च्या सरासरीने १५,९२१ धावा, एकदिवसीय सामन्यात ४४.८३च्या सरासरीने १८,४२६ धावा आणि एका टी-२०मध्ये १० धावा केल्या.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com